# पुणे महानगरपालिका

**स्थायी समिती सभा**

**कार्यपत्रिका क्र.३१, दि.१९/१०/२०१५**

**सभा क्र.४४,दि.१९/१०/२०१५ चा वृत्तांत**

नगरसचिव
विषय क्र. १३४८ ते १३८४
दा. वि.क्र. १३८५ ते १४१५
ठराव क्र. १३४८ ते १४१५

स्थायी समितीची साप्ताहिक सभा सोमवार, दिनांक १९/१०/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता म.ज्योतिबा फुले सभागृहात (स्थायी समितीच्या सभागृहात) भरली होती.

सदर सभेस खालील मा.सभासद उपस्थित होते.

१. मा. सौ.कदम अश्विनी नितिन – अध्यक्षा
२. मा. अलगुडे मुकारी आण्णा

३. मा.सौ.आंदेकर राजश्री सुर्यकांत
४. मा.सौ.ओरसे शारदा शंकर
५. मा.कर्णे (गुरूजी) बापूराव गंगाराम
६. मा.ॲड.कदम रामचंद्र उर्फ चंदुशेठ आत्माराम
७. मा.केमसे शंकर दत्तात्रय, सभागृहनेते
८. मा.सौ.ओसवाल दिपाली प्रमोद
९. मा.जगताप बाळा उर्फ श्रीकांत शशिकांत
१०. मा. सौ.टिळक मुक्ता शैलेश
११. मा.तुपेरे राहूल बापू
१२. मा.बागवे अविनाश रमेश
१३. मा.सौ.बाबर आरती साईनाथ
१४. मा. राणे अनिल बाबूराव
१५. मा.सौ.लोणकर नंदा नारायण
१६. मा.शिळीमकर राजेंद्र यशवंत

खालील निमंत्रित इतर मा.सभासद निमंत्रणावरुन उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| मा. श्रीमती नीलम कुलकर्णी | मा. | मा. | मा. |
| मा. | मा. | मा. | मा. |

लघुलेखक :-

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

१. मा. कुणाल कुमार , महापालिका आयुक्त
२. मा. ,अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
३. मा. ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (वि.)
४. मा.राजेंद्र जगताप,अति.महा.आयुक्त (इ)
५. मा.अभिषेक कृष्णा,अध्यक्ष व व्यव. संचालक,पीएमपीएमएल
६. मा.सुनिल पारखी, नगरसचिव
७. मा.हनुमंत नाझीरकर, प्र.संचालक(ना.वि.यो.)
८. मा.अंबरिष गालिंदे,सह आयुक्त (लेखापरिक्षक)
९. मा. सुहास मापारी,(कआ. व क.सं. प्रमुख)
१०. मा.अनिल पवार, उपायुक्त (विशेष)
११. मा.मोरे दगा पितांबर, उपायुक्त (ग.व.नि.)
१२. मा.प्रकाश बोरसे, उपायुक्त (जिं.घ.)
१३. मा.मंगेश जोशी, उपायुक्त (जनरल)(सेवकवर्ग)
१४. मा.विजय दहीभाते, उपायुक्त (तांत्रिक)
१५. मा.डॉ.एस.टी.परदेशी, प्र.आरोग्यप्रमुख
१६. मा.सौ.उल्का कळस्कर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१७. मा. विलास कानडे, उपायुक्त स्थानिक संस्था कर
१८. मा.प्रशांत वाघमारे, नगर अभियंता
१९. मा.विवेक खरवडकर, अति.नगर अभियंता (पथ) व (जनेयो क्र.१ )
२०. मा. सौ. मिनाक्षी राऊत,शिक्षणाधिकारी, माध्य.व तां.शि.
२१. मा. दहीफळे बबन, शिक्षणप्रमुख, शिक्षण मंडळ
२२. मा.थोरात, प्र.मुख्य विधी अधिकारी
२३. मा.माधव जगताप, प्र.उपायुक्त अतिक्रमण
२४. मा.घोरपडे, सहा.उद्यान अधिक्षक
२५. मा. , उपायुक्त (समाजकल्याण)
२६. मा.श्रीनिवास बोनाला,अति.नगर अभियंता (प्रकल्प व वाहतूक नियोजन व जनेयो क्र.२)
२७. मा.प्रशांत रणपिसे, मुख्य अग्निशामक अधिकारी
२८. शिवाजी दौंडकर, मुख्य कामगार अधिकारी
२९. मा.सुनिल केसरी, उपायुक्त (वि.का.१)
३०. मा.ज्ञानेश्वर मोळक, उपायुक्त (वि.का.२)
३१. मा.मधुकांत गरड, उपायुक्त (वि.का.३)
३२. मा.सुरेश जगताप, उपायुक्त (वि.का.४)
३३. मा.किशोरी गद्रे, उपायुक्त (वि.का. घनकचरा व्यवस्थापन)
३४. मा.सतिश कुलकर्णी, उप आयुक्त (भु.जि.)
३५. मा.प्रमोद निरभवणे, अधी. अभि. (मलनिस्सारण)
३६. मा.श्रीनिवास कंदूल, अधीक्षक अभियंता (विद्युत)
३७. मा.श्रीकृष्ण चौधरी, कार्यकारी अभियंता (विद्युत)
३८. मा.ना.न.बारापात्रे, विकास अभियंता, (पथ)
३९. मा.राजेंद्र राऊत, कार्यकारी अभियंता(भवन)
४०. मा.विजय कुलकर्णी,अधी.अभि.(ड्रेनेज व पा.पु.)
४१. मा.मदन आढारी, अधीक्षक अभियंता
४२. मा.अब्बास पटेल, अधीक्षक अभियंता
४३. मा.संजय मोरे, जनता संपर्क अधिकारी
४४. मा.डॉ.उदय टेकाळे, वि. कार्या.(दक्षता) (सांख्यिकी व संगणक)
४५. मा.किशोर पोळ, कार्यकारी अभियंता (व्हे.डेपो)
४६. मा.उमेश माळी
४७. मा. राहूल जगताप, सांख्यिकी व संगणकप्रमुख
४८. मा.सुभाष पुरी, पं.नेहरू स्टेडियम व्यवस्थापक
४९. मा.गणेश सोनुने, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी
५०. श्री.धारूरकर जनरल मॅनेजर (ऑप.ॲण्ड.इजि.)

# पुणे महानगरपालिका

**स्थायी समिती सभा**

**कार्यपत्रिका क्र.३१,दि.१९/१०/२०१५**

**सभा क्र.४४,दि.१९/१०/२०१५ चा वृत्तांत**

मा.अध्यक्षा–प्रथम श्रध्दाजंली वाहू या.

**श्रीमती विजया मोहिते, माजी मंत्री मदन पाटील, जेष्ठ बांधकाम व्यवसायिक शरदचंद्र बेलवलकर आणि नगरसचिव कार्यालयातील शिपाई मधुकर मोकाटे यांचे निधन झाले. त्यांना श्रध्दाजंली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.**

मा.अध्यक्षा–सभा सुरू करावी.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–मा.चेअरमन साहेब, आजच्या वर्तमानपत्रामध्ये पी.एम.पी.एम.एल.संदर्भात बातमी आली आहे की, बस मधील कंडक्टरने प्रवासी विद्यार्थ्यींनींना अपमानित केले व त्या मुलींना पाया पडायला लावले.

मा.दिपाली ओसवाल–मा.अध्यक्षा, होय आजच्या पेपरला ही बातमी आहे.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–ही बातमी सगळया वर्तमानपत्रांमध्ये आली आहे आणि हे चुकीचे आहे. त्या विद्यार्थ्यींनी कंडक्टरला बसचा पास दाखविला होता.

मा.अध्यक्षा–त्या मुली कोणत्या शाळेतील होत्या?

मा.मुकारी आण्णा आलगुडे–त्या विद्यार्थ्यींनी पुलगेट येथील ऊर्दू हायस्कूल या शाळेतील आहेत. कंडक्टरने त्या मुलींना पुढच्या बसस्टॉप वर नेऊन पाया पडायला लावले, हे चुकीचे आहे.

मा.अध्यक्षा–याबाबत पी.एम.पी.एम.एल.च्या अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

श्री.धारूरकर जनरल मॅनेजर (ऑपरेशन ॲण्ड इजिनिंअरींग–पी.एम.पी.एम.एल.)–१७ तारखेला काही विद्यार्थ्यांना बसमधून खाली उतरविले होते. कोथरूड येथील डेपोमध्ये त्या मुलांचे पालक आले होते आणि त्यांनी असे सांगितले की, त्यांच्या मुलींना कंडक्टरने पाया पडायला लावले. याबाबत संबंधितांकडे बस नंबरचे डिटेल्स नव्हते. आम्ही आज ते ड्रायव्हर, कंडक्टर्स बुक केलेले आहेत. ते सर्व काल होते. ही घटना परवा दिवशी दु.४.०० ते ५.०० घडली आहे आणि त्या वेळेदरम्यानचे ५ ते ६ कंटक्टर्स आहेत त्यांना त्यांना आज बोलावले आहे आणि त्यांच्याकडून इन्क्वॉयरी करून त्यांच्यामध्ये जो कोणी दोषी आढळेल.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–साहेब, त्या मुलींकडे बसचे पास होते आणि तो पास त्यांनी बसमध्ये दाखविला होता तरी देखील त्याने त्या मुलींना स्वारगेटला नेले आणि तेथे काही निम्या मुलींना खाली उतरविले आणि काही मुलींना तो स्वारगेट डेपो येथे घेउन गेला आणि तेथे त्या मुलींना पाया पडायला लावून त्या मुलींना नेहरू स्टेडियम येथे उतरण्यास भाग पाडले. हे चुकीचे आहे.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–आम्ही त्याच्यावर निश्चितपणे कारवाई करणार आहोत.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–कारवाई म्हणजे काय, त्या मुलीं आपल्या मुलींसारख्या मुली आहेत.

मा.अध्यक्षा–ते कंडक्टर कोण आहेत?

मा.मुकारी आण्णा आलगुडे–त्या कंडक्टरचे नाव काय आहे?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–त्यांनी अजून बस नंबर दिलेला नाही. आयडेंटीफिकेशनसाठी दु.४.०० ते दु.५.०० या वेळेमध्ये त्या भागातून जेवढ्या बसेस आलेल्या आहेत त्यामध्ये ६ कंडक्टर आहेत. आज त्यांची ड्युटी बंद करून त्यांना बोलाविलेले आहे.

मा.अध्यक्षा–एवढी गंभीर घटना घडली आणि आपल्याला अजून त्याचे नाव कळाले नाही?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–संबंधितांनी बस नंबर दिलेला नाही आणि ती बस कोणती होती त्याची माहिती दिलेली नाही.

मा.सौ.दिपाली ओसवाल–बस कंडक्टर्स व्यवस्थित वागत नाहीत, याचा मला सुध्दा अनुभव आला आहे. मी स्वारगेट ते अप्पर बिबवेवाडीच्या बसने प्रवास करीत होते आणि त्यावेळी आम्ही आमचे मा.सभासदाचे कार्ड, ओळखपत्र दाखविले तर तो कंडक्टर असे म्हंटले की, हे कार्ड सिक्युरिटीचे आहे. त्याने आमचा किती मोठा अपमान केला. तुम्ही त्या कंडक्टरला सस्पेंड केले नाही. त्याला सहा महिन्यांसाठी कामावरून कमी केले नाही आणि परत त्याला पुन्हा त्याच ठिकाणी कामाला ठेवले आहे. तुम्ही महिला प्रवाशांना अशी वागणूक देता का?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–असे असेल तर त्याच्यावर कारवाई केली पाहिजे.

मा.अध्यक्षा–कंडक्टर असे सांगतात की, हे सिक्युरिटीचे कार्ड आहे.

मा.सौ.दिपाली ओसवाल–मी याबाबत पत्र सुध्दा दिले आहे आणि तुम्ही त्याच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–मा.अध्यक्षा, पी.एम.पी.एम.एल.मध्ये हे काय चालले आहे?

मा.सौ.दिपाली ओसवाल–मा.सभासदाना अशी वागणूक देत असतील तर तिथे ते जनतेची काय किंमत करणार आहेत?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–त्याच्यावर जर कारवाई झाली नसेल तर त्याच्यावर मी कारवाई करतो.

मा.राहूल तुपेरे–मा.अध्यक्षा, आमचे म्हणणे असे आहे की, ज्या बसने विद्यार्थ्यींनी प्रवास करणार असतील तिथे लेडीज कंडक्टरच ठेवाव्यात. कारण गेल्यावर्षी एका कंडक्टरने मुलींची छेडछाड केली होती आणि मी त्यांच्या विरोधात पोलीसांमध्ये तक्रार दिली होती. त्यामुळे अशा ठिकाणी महिला कंडक्टर्स ठेवाव्यात.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– आपल्याकडे महिला कंडक्टर्स किती आहेत? याची माहिती द्यावी.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–आपल्याकडे ७० महिला कंडक्टर्स आहेत. आपण त्यांना महिला स्पेशल बसेसवर सुध्दा नेमलेले आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण ज्यावेळी भरती करणार आहोत त्यावेळी महिला सेवकांचा कोटा पूर्ण होईपर्यंत, जेवढे पुरूष सेवक आहेत तेवढयाच महिला सेवक होईपर्यंत तोपर्यंत पुरूष सेवकांची भरती करायची नाही. यामुळे ते प्रमाण बरोबर होईल आणि मग महिलांवर जो अत्याचार किंवा जो अन्याय केला जातो त्याला पायबंद बसेल.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–आपण या घटनेबाबत काय करणार आहात?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–आम्ही त्याच्यावर कारवाई करणार आहोत. त्याच्यावर निलंबन करून कारवाई करण्यात येईल फक्त आज संध्याकाळ पर्यंत ते कंडक्टर आयडेंटीफाय होतील. कारण त्यांनी काल दुपारी तक्रार केली आहे अजून त्यांनी लेखी दिलेले नाही. तरी सुध्दा आपण त्यावर कारवाई सुरू केलेली आहे.

मा.अध्यक्षा–मा.स्थायी समितीकडून, पी.एम.पी.एम.साठी हव्या त्या पध्दतीने निधी मंजूर करून दिला जातो आणि ही परवा घडलेली घटना आहे आणि आतापर्यत तुमच्याकडे त्या इसमाचे नाव आलेले नाही.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–काल दुपारी ते पालक आमच्याकडे आले होते.

मा.अध्यक्षा–ही घटना तुम्हाला गंभीर वाटत नाही का?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–मा.अध्यक्षा, आम्ही ही घटना गांर्भीयाने घेतली आहे.

मा.अध्यक्षा–तुम्ही पुणेकर नागरीकांना चांगल्या सोयी सुविधा देण्याचे सोडून, तुमचे कंडक्टर जर अशा पध्दतीने वागत असतील कारण हा एकच किस्सा नाही. मध्यंतरी रविवारच्या दिवशी सेवासदनच्या विद्यार्थ्यींनीच्या बाबतीत घडला होता, त्यांचा इ.१० वी.च्या परिक्षेचा कालावधी होता आणि त्या मुली जादाच्या तासासाठी शाळेमध्ये आल्या होत्या. त्या वर्गानंतर त्या मुली घरी जाण्यासाठी शनिपारच्या बसस्टॉपवरून बसमध्ये चढल्या असता, रविवारचा दिवस आहे आणि आज शाळेला सुट्टी आहे, असे सांगून त्या मुलींना बसमधून खाली उतरविले होते. कोणत्या शाळेला सुट्टी आहे किंवा नाही? हे तुमचे कंडक्टर ड्रायव्हर ठरविणार का? ते माहिती घेत नाहीत आणि ते त्यांच्या मनाप्रमाणे कामकाज करतात. तुम्ही त्यांना एकदा समज दिली पाहिजे आणि तुम्ही त्यांना प्रशिक्षण द्यावे.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–आम्ही त्यांना समज आणि प्रशिक्षण देऊ.

मा.अध्यक्षा–कंडक्टर्स आणि ड्रायव्हरने शालेय विद्यार्थ्यांशी कसे वागले पाहिजे यांचे पहिल्यांदा ट्रेनिंग द्यावे आणि मुलींना पाया पडायला लावणे ही बाब तर अतिशय गंभीर आहे.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–आम्ही डेपोवाईज प्रशिक्षण देऊ आणि आज कंडक्टर आयडेन्टीफाय झाल्यानंतर त्यावर कडक कारवाई करू.

मा.राहूल तुपेरे–तुम्ही त्यावर कोणती कडक कारवाई करणार आहात?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–त्याचे निलंबन करून त्याची चौकशी करणार आहोत.

मा.राहूल तुपेरे–त्याच्यावर गुन्हा दाखल करावा. यामध्ये पोलीस कंम्पलेन्ट दिली पाहिजे.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–आज त्या पालकांना बोलविले आहे.

मा.राहूल तुपेरे–ही जबाबदारी त्या पालकांची नाही. ते विद्यार्थी आपल्या बसमधून प्रवास करतात. तुम्ही गुन्हा दाखल केला पाहिजे, ही तुमची जबाबदारी आहे.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–एकदा कंडक्टर आयडेन्टीफाय झाल्यानंतर आपण त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करू.

मा.राहूल तुपेरे–नाही, तुम्ही निलंबन करा परंतु यामध्ये त्याच्यावर पोलीस कंम्पलेन्ट झाली पाहिजे.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–तो कंडक्टर कोणत्या रूटला होता? हे तुम्हाला माहिती नाही.

मा.सौ.रूपाली ओसवाल–यांना सगळे माहिती असते.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–ही दुपारी ४.०० ते ५.०० च्या दरम्यानची घटना आहे.

मा.मुकारी आण्णा आलगुडे–रूटवर चेकर असतात.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–त्यांनी त्याचवेळेस चेकरला रिर्पोट दिला असता तर योग्य झाले असते परंतु ते पालक काल दुपारनंतर तो कंडक्टर कोण आहे? ते पाहण्यासाठी डेपोमध्ये आले होते.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–ज्या मुलींच्या बाबतीत ही घटना झाली ती मुलगी कोण आहे? ते माहिती आहे का?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–काल ते पालक आणि ती मुलगी डेपोमध्ये आले होते.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–मग त्यांना माहिती असेल की, त्यांनी कोणत्या बसने प्रवास केला?

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–त्यांना आज बोलविलेले आहे.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–त्यांना रूट माहिती आहे, सगळे माहिती आहे. तुम्ही टाळाटाळ करीत आहात.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–त्यांना बस नंबर माहिती नाही, त्या मुली पूलगेट येथे बसमध्ये चढल्या आणि स्वारगेट येथे बसमधून उतरल्या होत्या.

मा.अनिल राणे–त्या मुलींना नंबर माहिती नसेल परंतु वेळ माहिती असल्याने तुम्हाला बसची माहिती मिळू शकेल.

श्री.धारूरकर,जनरल मॅनेजर (पीएमपीएमएल)–आम्ही अशा ६ बसेसची माहिती काढली आहे आणि अशा ६ बसेसच्या ड्रायव्हर, कंडक्टर यांना बोलविले आहे. आज ती तपासणी होईल आणि त्यामध्ये तो कंडक्टर आपल्याला सापडेल.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–ठीक आहे.

मा.सौ.नंदा लोणकर–माझ्या प्रभागामध्ये महात्मा फुले नाट्यगृह आहे आणि तिथे आमच्या प्रभागातील नुपूर डॉन्स ॲकेडमीचा कार्यक्रम आयोजित केला होता. तिथे लहान लहान मुलींचे डान्स आयोजित केले होते परंतु कार्यक्रमाच्या वेळी अचानक विद्युत पुरवठा खंडीत होऊन संपूर्ण अंधार झाला. त्यावेळी तेथील आपली जनरेटर व्यवस्था अजिबात काम करीत नव्हती. आम्ही या सुविधेबद्दल विचारणा केली असता, तेथील कर्मचारी, श्री.वणवे यांनी असे सांगितले की, आम्ही ही विद्युत व्यवस्था दररोज तपासतो. ते नाट्यगृह सुरू होऊन ६ महिनेच झाले आहेत आणि तेथील जनरेटर काम करीत नसेल तर हे वाईट आहे. त्यावेळी पाहणी केली असता त्या जनरेटरमध्ये डिझेल किंवा त्यांचे योग्य ते सर्व्हिसिंग झालेले नव्हते. त्यावेळी त्यांनी जनरेटरच्या सर्व्हिसिंगसाठी काही लोकांना बोलाविले परंतु ते त्यावेळी चालू झाले नाही. त्या दरम्यान त्या लहान मुली अर्धातास रडत होत्या आणि त्या अर्ध्यातासामध्ये आपल्या लोकांनी काहीही मदत केली नाही.

मा.अध्यक्षा–या घटनेबाबत माहिती द्यावी.

श्री.दहिभाते, उपायुक्त (तां)–मा.चेअरमन साहेब, याबाबत मा.सभासद यांचा दूरध्वनी आला होता आणि त्यावेळी श्री.वणवे हे सुध्दा माझ्याशी बोलले आहेत. ते कर्मचारी या जनरेटरची दररोज ट्रायल घेत होते परंतु त्यामध्ये तांत्रिक फॉल्ट झाला होता आणि तेथील विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. आम्ही याबाबतचा अहवाल मागविला आहे आणि तो लवकरच प्राप्त होईल.

मा.सौ.नंदा लोणकर–मा.अध्यक्षा, तिथे कोणतीही व्यवस्था नाही. तेथील विद्युत पुरवठा एक तास खंडीत झाला होता आणि संबंधित लोकांना त्या हॉलचे भाडे भरले होते. त्या कार्यक्रमासाठी लहान लहान मुलीं आवरून तिथे आल्या होत्या आणि त्यावेळी तिथे पालकांचा खूप दंगा झाला होता. त्यावेळी मी त्या कार्यक्रमाला उपस्थित असल्यामुळे, मी पटकन एम.एस.सी.बी.ला फोन करून आम्ही तेथे तात्पुरती व्यवस्था केली आणि जर ही व्यवस्था झाली नसती तर आपल्या जनरेटरचा उपयोग काय आहे? तिथे खूप अंधार होता आणि लहान लहान मुली रडत होत्या आणि त्यामुळे त्यांचे पालक व्हॉयलेन्ट झाले होते.

मा.अध्यक्षा–आपण ही व्यवस्था चालविण्यासाठी कोणाला काम दिले आहे का?

श्री.दहिभाते,उपायुक्त (तां)–ही व्यवस्था आपल्या सेवकांकडून तपासली जात होती.

मा.अध्यक्षा–याबाबत पुढील सभेत अहवाल सादर करावा.

मा.सौ.दिपाली ओसवाल–मा.अध्यक्षा, आम्हाला नाल्याच्या विषयाबाबत बोलायचे आहे. प्रत्येकाच्या प्रभागामध्ये एक नाला असतो. तो वाहतो, त्याबाबत कोणीही व्हिजीट करीत नाहीत. काही ठिकाणी नाले बंद आहेत आणि त्यावर घरे बांधली जात आहेत आणि तेथे नाही ते वेगळे प्रकार चालतात. आपण श्री.बेलदार अधी.अभि.(मलनिस्सारण) यांना काढून तरी टाका. आम्ही त्यांची अनेकवेळा तक्रार करीत आहोत कारण ते आमचा खूप अपमान करतात. ते आम्हाला काही किंमतच देत नाहीत.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–मा.बकोरिया महा.आयुक्त साहेब, मी आपणास आमच्या प्रभागातील कामाबाबत बोललो होतो. मी आपणास तेथील क्लीप सुध्दा पाठविली होती आणि याबाबत मी श्री.बेलदार अधी.अभि.(मलनिस्सारण) यांचेसह १० ते १५ वेळा बोललो आहे परंतु तेथे अद्याप काहीही काम झालेले नाही आणि त्याची बोलण्याची पध्दत किंवा त्यांना त्या गोष्टी मध्ये इंटरेस्टच नाही, असे दिसून येते.

मा.सौ.दिपाली ओसवाल–ही पध्दत आहे का?

मा.ॲड.चंदूशेठ कदम–साहेब, तुम्ही तेवढा फालोअप करता छोट्या छोट्या गोष्टींसाठी आम्हाला तुम्हाला दूरध्वनी करावा लागतो.

मा.श्रीमती नीलम कुलकर्णी–मा.अध्यक्षा, या संदर्भात मला बोलण्याची परवानगी द्यावी.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–त्यांनी किती वेळा व्हिजीट केल्या, याबाबत त्यांना विचारावे.

मा.सौ.दिपाली ओसवाल–आम्ही त्यांना कितीवेळा फोन करावा? हे योग्य नाही. एकतर त्यांना सस्पेंड करावे.

मा.ॲड.चंदूशेठ कदम– कामासाठी बजेट नाही, पैसे नाहीत ही कारणे होऊशकत नाहीत. तेथील पाणी थांबविण्याचे काहीतरी नियोजन केले पाहिजे.

श्री.प्रदीप बेलदार,अधी.अभि.(मलनिस्सारण) – आपण त्या जागेवर चारवेळा चेंबर दुरूस्त केले आहे.

मा.ॲड.चंदूशेठ कदम– आपण कोठे काम केले ते दाखवावे. मी आपणास व्हिजीटला सुध्दा बोलाविले होते.

मा.सौ.दिपाली ओसवाल–श्री.बेलदार साहेब, आपण काहीच काम करीत नाही.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–मी १५ दिवसांपासून बोलत आहे मी आपणास व्हिजीटसाठी बोलाविले होते आणि ते दुरुस्त केले असे सांगून ते खोटे बोलत आहेत.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–आपल्या वॉर्डमध्ये ४ कामे होती. तुम्ही ४ कामे दाखविली होती आणि ह्या कामासाठी तुम्हाला जवळजवळ १६ लाख रू.आवश्यक होते.

मा.ॲड.चंदूशेठ कदम– परंतु त्यांनी याठिकाणी कितीवेळा व्हिजीट केली? त्याबद्दल विचारावे.

मा.सौ.दिपाली ओसवाल–लोकांची इच्छा आहे की, ही कामे तातडीने व्हावीत.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–या कामाच्याबाबत त्यांना आम्ही असे सांगितले आहे की, ही दुरूस्ती वॉर्ड ऑफिसच्या मार्फत करून घ्यावी.

मा.ॲड.चंदूशेठ कदम– ते आमचा फोन घेत नाहीत. पैसे नाहीत, बजेट नाही, ते अशी उत्तरे देऊ शकत नाहीत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– याबाबतचा खुलासा करताना त्यांचे म्हणणे काय आहे? ते सुध्दा ऐकून घ्यावे.

मा.श्रीमती नीलम कुलकर्णी–मी प्रथम मा.अध्यक्षा यांचे आभार मानते की, त्यांनी मला बोलण्याची संधी दिली. आमच्या प्रभागातील कामासाठी मागील वर्षी ५० लाख रू.चे बजेट होते, ते बजेट ड्रेनेज विषयक होते आणि त्या संदर्भात ओम यशोदा कॉन्ट्रक्टस, या नावाचे ठेकेदार या संदर्भात काम करीत आहेत. यामध्ये त्यांची काम करण्याची अजिबात मानसिकता नव्हती. मी पाठपुरावा करून करून जेव्हा खात्याकडे गेले. मी श्री.बेलदार साहेब यांच्याकडे सुध्दा गेले होते आणि या कामाची वर्कऑर्डर सुध्दा तयार करण्यात आली नव्हती. शेवटी ती ऑर्डर श्री.खरवडकर साहेब,अति.नगर अभि.(पथ) यांनी खात्याकडून काढून दिली. त्यावेळी ते ठेकेदार ती वर्कऑर्डर घेण्यास सुध्दा तयार नव्हते आणि नंतर ते काम चालू झाले. मी कामासाठी किती फालोअप केला आहे ते मा.बकोरिया साहेब यांना माहिती आहे की, मी या कामासाठी अगदी मा.सारंग आव्हाड, पोलीस उप आयुक्त (वाहतूक) यांच्याकडे सुध्दा पोलीस परवानगीसाठी फालोअप केला. मी सगळ्या अधिकाऱ्यांकडे फालोअप केला आणि मग हे काम चालू झाले आणि त्यानंतर परिसरातील नागरीकांनी आम्हाला असे सांगितले की, ताई या कामाचा दर्जा चांगला नाही, तेथील पाईप्स चांगले नाहीत. त्यामुळे मी तिथे जाऊन त्यांच्याकडे टेस्टींग रिर्पोटस मागितले आणि मला खोटे टेस्टींग रिर्पोट देण्यात आले आहे. मी याबाबत मा.अति.महा.आयुक्त, बकोरिया साहेबांकडे तक्रार केली आहे. मा.बकोरिया साहेब यांनी माझ्यासमोर श्री.अक्कावारे यांना असे सांगितले होते की, इ.आय.एल.चे रिर्पोट द्यावेत. त्यानंतर दि.१२ ऑक्टोंबरला मला खात्याचे पत्र आले आहे की, तुम्ही आणि तुमचे सहकारी नाहक साईटवर येऊन सतत त्रास देता.या पध्दतीने मला श्री.बेलदार अधी.अभि.(मलनिस्सारण) या अधिकाऱ्याने पत्र दिले आहे. महिला नगरसेविकेला अशा पध्दतीने बोलण्याची ही काय पध्दत झाली का?

मा.अविनाश बागवे– मा.अध्यक्षा, हे जर असे होत असेल की, मा.नगरसेविका त्यांचे काम होत नाही म्हणून तक्रार करतात, पत्र व्यवहार करतात आणि त्यावर अधिकारी, तुम्ही नाहक त्रास देत आहात असे उत्तर देत असेल की,तर ही अतिशय गंभीर गोष्ट आहे.

मा.श्रीमती नीलम कुलकर्णी–साहेब, माझ्या ऑफिसमध्ये त्या कामाचे ठेकेदार येतात आणि विषय मिटवावा, असे सांगतात. त्यांना त्या अधिकाऱ्याने असे सांगितले आहे की, त्या बाईंना भेटा आणि विषय मिटवा.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– मा.आयुक्त साहेब, अधिकाऱ्याला नगरसेवकांना अशा पध्दतीने पत्र देता येते का?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)– अशा प्रकारचे हे चुकीचे आहे. त्याला एक मर्यादा आहे.

मा.अध्यक्षा–आपल्याकडे पुरावा आहे का?

मा.श्रीमती नीलम कुलकर्णी–माझ्याकडे ते पत्र आहे. मी पत्र मा.बकोरिया साहेबांकडे दिले आहे आणि माझ्याकडे त्या पत्राची कॉपी आहे. त्या पत्रावर ९ सप्टेंबर अशी तारीख आहे आणि हे पत्र मला दि.१२ ऑक्टोंबर रोजी मिळाले आहे. त्या पत्राच्या पाकिटावर सुध्दा त्यांनी ९ सप्टेंबरची तारीख दिली आहे आणि दि.१२ ऑक्टोंबर रोजी पोस्टाचा स्टॅम्प पडला आहे. तो पत्र पोस्ट केल्याचा दिनांक आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ही काहीतरी गडबड आहे.

मा.अविनाश बागवे– मा.अध्यक्षा, हा अधिकाऱ्याच्या हलगर्जीपणाचा कळस आहे. एक महिला नगरसेविका, गेल्यावर्षीचे बजेट खर्ची पडावे म्हणून ती बिचारी तळमळ करते. त्या खात्याकडे पाठपुरावा करून तुम्हाला वर्कऑर्डर द्यायला सांगतात आणि ते काम केले नाहीतर संबंधितांवर कारवाई केली पाहिजे परंतु ते सोडून तुम्ही मा.सभासद यांनाच पत्र देत आहात.

मा.श्रीमती नीलम कुलकर्णी–मा.अध्यक्षा, मी याबद्दल महिला आयोगाकडे तक्रार करते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आमच्या सगळया कमिटीची अशी मागणी आहे की, आम्ही आता तुम्हाला ठराव करून देतो आणि त्या ठरावावर प्रत्येक सभासद सही करेल आणि त्या ठरावानुसार ताबडतोब आजच्या आज त्यांच्यावर कारवाई करावी. आम्ही त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची मागणी करीत आहोत. संपूर्ण स्थायी समिती ही मागणी करीत आहे. त्यामुळे आजच्या आज ही कारवाई करावी.

मा.राहूल तुपेरे–साहेब, आपण ही कारवाई करावी कारण नगरसेवकांना जर असा त्रास होत असेल तर हे चुकीचे आहे. आमचा तुमच्यावर विश्वास आहे, तुम्ही त्यांच्यावर कारवाई करावी.

मा.अध्यक्षा–बेलदार साहेब, सन्माननीय नगरसेवक, हे पुणे महानगरपालिकेचे ट्रस्टी आहेत आणि त्यांना सूचना करण्याचा तुम्हाला कोणताही अधिकार नाही. तुम्ही आमच्या सूचनांची अंमलबजावणी करायची असते आणि तुम्ही जर अशा पध्दतीने पत्र व्यवहार करीत असाल तर ही बाब अतिशय गंभीर आहे. मुळामध्ये क्वॉलिटीचे काम होण्यासाठी मा.सभासद एवढी धडपड करीत आहेत आणि ते वारंवार त्या कामासाठी पाठपुरावा करीत आहेत आणि मागील वर्षाचे काम अजून जर झाले नसेल आणि पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून कोट्यावधी रूपयांची कामे होतात आणि आपण अशा पध्दतीने पत्रव्यवहार केलात, ही बाब तुम्हाला अतिशय गंभीर वाटत नाही का? संबंधीत सभासदाची तक्रार आहेच परंतु ड्रेनेजच्या संदर्भात बाकीच्या सभासदानी जी कामे सांगितली उदा.मा.सौ.दिपाली ओसवाल यांनी त्यांच्या प्रभागातील काम सांगितले, मा.चंदूशेठ कदम यांनी सांगितले आणि माझ्या वॉर्डातील काम तसेच पडले आहे आणि त्या कामाची सुध्दा आपण काही दखलच घेतली नाही. मी मागील वेळेस दूरध्वनी केला होता त्याबाबत तुम्ही असे सांगितले की, माझा फोन बंद आहे. माझा हॅण्डसेट खराब झाला आहे. त्यानंतर तुम्हाला त्या कामाबाबत काही वाटले का? की या विषयाला आता चार महिने झाले आहेत. मी त्यावेळी तिथे मा.बकोरिया अति.आयुक्त, साहेब यांच्यासह पाहणी केली होती. या चार महिन्यांमध्ये तुम्हाला असे वाटले का की, ताईंच्या वॉर्डमध्ये हे काम आहे आणि आपण ते पूर्ण करावे. आम्ही इथे दोन, दोन सन्माननीय पदाधिकारी आहोत तरीसुध्दा तुम्हाला यत्किंचितही फरक पडत नाही की, आपण ते काम अपूर्ण ठेवत आहोत. आपण त्याचा पाठपुरावा करावा आणि ही बाब अतिशय गंभीर आहे की, तुमची स्वत:ची मानसिकता नाही. तुम्हाला स्वत:ला काम करावेसे वाटत नाही त्यामुळे तुम्ही कुठल्याही खात्यामध्ये काम करण्यास लायक नाही. जर तुम्ही या खात्यात काम करू शकत नसाल तर, तुमची दुसऱ्या खात्यात बदली काम करूनही तेथील काम होणार नाही. कारण तुमची स्वत:ची मानसिक इच्छा नाही. त्यामुळे आज खरोखर मा.स्थायी समितीमध्ये ठराव तयार करावा.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–त्यांची कुठल्याच खात्यामध्ये काम करण्याची मानसिकता दिसत नाही. त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात? आणि त्यांच्याकडील कामे कशी पूर्ण करणार आहात?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– त्याबद्दल प्रशासन ठरवेल.

मा.अध्यक्षा–सर, आमची जी काही पेन्डींग कामे राहिली आहेत त्या संदर्भात आम्हाला, मग त्यामध्ये मा.चंदूशेठ कदम असतील, मा.श्रीमती निलम कुलकर्णी असतील, मा.सौ.दिपाली ओसवाल असतील आणि इव्हन स्वत: माझ्या वॉर्डातील काम असेल किंवा कोणत्याही सभासदाचे कामे असतील. सर्व नगरसेवकांची जी कामे असतील ज्यांचे टेंडर ओपन झालेले आहे पण कामच सुरू झालेले नाही.

मा.ॲड.चंदूशेठ कदम– डुक्करवाले लोक प्रत्येक ठिकाणी ड्रेनेज लाईन्स फोडतात, त्याबद्दल काय करणार आहात? याबद्दल माहिती द्यावी.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्यासाठी वेगळा उपाय करावा लागणार आहे.

मा.श्रीमती नीलम कुलकर्णी–साहेब, आम्ही प्रभागासाठी एवढे कष्ट घेऊन प्रभागात निधी आणतो आणि अतिशय जीवांचा आकांत करून आम्ही कामे लावून घेऊन ती कामे करण्याचा प्रयत्न करतो पण आम्हाला अधिकाऱ्यांकडून अतिशय वाईट ट्रीटमेंट मिळते.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–शिक्षण मंडळाकडील शिपायांच्या बाबतीत काय झाले? याची माहिती द्यावी.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, आम्ही ९ सप्टेंबर २०१४ रोजी याबाबत निवेदन ठेवले होते. त्यामध्ये ही पदे कशी भरली? किंवा त्यामध्ये काय आहे? इ.याबाबत दिले होते. शेवटी मा.डी.एम.सी.(जनरल) यांनी त्यावर असा शेरा लिहला आहे की, जाहिरातीचे अवलोकन केले असता त्यामध्ये संपूर्ण ५० पदांची मागणी केलेली आहे. तथापि सेवक निवड समितीने एकूण ६५ पदांची शिफारस केलेली आहे. जाहिरात देताना, जाहिरातीमध्ये मंजूर बिंदू नामावलीनुसार रोस्टर दाखविणे आवश्यक असते. तथापि जाहिरातीमध्ये रोस्टर नमूद केलेला नाही. तसेच शिक्षण मंडळाकडे शासन मान्य आकृतीबंध उपलब्ध नाही त्यामुळे एकूण मंजूर पदांची संख्या निश्चित होत नाही. तरी शासननिर्णय दि.२६/८/२०१४ प्रमाणे शिक्षण मंडळाने आकृतीबंध व पदाची मान्यता घेणेबाबत, शासनाकडे पाठविणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा जो विषय आहे तो आताचे रजा मुदतीतील शिक्षक होते तसाच आहे का?

मा.सौ.दिपाली ओसवाल–हो, तसाच आहे.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–काहींच्या ऑर्डर निघाल्या होत्या. ते कामाला हजर झाले होते.

मा.सौ.दिपाली ओसवाल–यामध्ये १२ जणांची ऑर्डर होती असे आम्हाला माहिती आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– हा विषय सुध्दा तसाच आहे का? त्यांच्यामध्येही अडचण होती आणि यांच्यामध्येही अडचण होत आहे का?

मा.ॲड.चंदूशेठ कदम–शिक्षणप्रमुख, आपण स्पष्ट सांगावे.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख– मा.अध्यक्षा, आपण शासनाकडे हे पाठविलेले आहे पण त्याचे उत्तर आलेले नाही.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–शिक्षकांच्या बाबतीमध्ये काही उत्तर पाठविले होते का?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख– ते अजून शासनाकडे पाठवायचे आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– आता शिक्षकांचे जाणार आहे आणि हे ऑलरेडी पाठविलेले आहे का?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख– होय, हे पाठविलेले आहे आणि शासनाने पुन्हा तसेच पाठविले की, अगोदर आकृतीबंध मंजूर करावा आणि मग या पदांच्या मान्यतेबाबत किंवा मागणी करणेस योग्य राहिल.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–शिक्षकांचा आकृतीबंध तयार केला आहे का?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख– शिक्षकांचा आकृतीबंध नाही तर शिक्षण विभागाकडून, दरवर्षी ३० सप्टेंबर रोजी,पटाप्रमाणे संच मान्यता असते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– शिपायांची मान्यता नसते का?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, शिपायांची तशी मान्यता नसते.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– तो विषय जर घ्यायचा असेल तर काय करावे लागेल? याबाबत माहिती द्यावी.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–जसे शिक्षकांच्या विषयाबाबत सांगितले होते तसेच या विषयाबाबतही सांगावे.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–पुन्हा, मा.आयुक्त साहेब आणि मा.स्थायी आणि मा.मुख्यसभेकडे पाठवावे लागेल.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मग तुम्ही तो प्रस्ताव ताबडतोब ठेवावा.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–ठीक आहे.

मा.अध्यक्षा– मागील वेळेस याबाबत चर्चा झाली होती.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–नाही, अगोदर पाठविलेले आहे.

मा.ॲड.चंदूशेठ कदम–तुम्ही या अगोदर का पाठविले नाही?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, या आधी शिक्षकांचे पाठविलेले आहे आणि यांचे पाठवायचे आहे. आम्ही याबाबत मा.आयुक्त साहेबांचे मार्गदर्शन घेऊ.

मा.सौ.दिपाली ओसवाल–आपण ज्यांना ऑर्डर दिली आहे, त्यांना तरी कामावर घ्यावे.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–ठीक आहे, याबाबत मा.महा.आयुक्त यांचेमार्फत मा.स्थायी समिती आणि मा.मुख्यसभेकडे निवेदन सादर करू.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–सदरचे निवेदन तातडीने पुढील मा.स्थायी समिती आणि मा.मुख्यसभेमध्ये सादर करावे.

मा.राहूल तुपेरे– मा.अध्यक्षा, माझ्या प्रभागातील शाळेसाठी मी शिक्षण प्रमुखांना इ.८ वी.चा वर्ग मागितला होता परंतु त्यांनी तो दिला नाही. आता मी शिक्षकांची मागणी करीत आहे तर त्यांनी आमच्या शाळेतील शिक्षक कमी केले आहेत. ते आमच्या प्रभागातील शाळा बंद करणार आहात का?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, आपण ८१ वर्गांसाठी मान्यता मागितली होती परंतु शासनाकडून १९ वर्गांना मान्यता मिळाली त्यामध्ये ज्यासाठी मान्यता मिळाली, ते वर्ग आपण सुरू केलेले आहेत आणि यावर्षी पुन्हा जेथील वर्गांसाठी काही त्रुटी असल्याने मान्यता मिळाली नव्हती त्यासाठी आपण यावर्षी पुन्हा मागणी करू.

मा.राहूल तुपेरे– आता आमच्या शाळेमध्ये शिक्षक नाहीत, त्याबद्दल काय करणार आहात? आपण इ.८ वी.च्या वर्गाबद्दल सांगत आहात परंतु तो वर्ग तर आमच्या शाळेमध्ये सुरू झालाच नाही पण त्या शाळेतील शिक्षक सुध्दा कमी केले आहेत. तुम्ही ती शाळा बंद करण्याचे नियोजन करीत आहात का? याबद्दल माहिती द्यावी.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, सध्या शिक्षक संख्या मंजुरीपेक्षा कमी आहे. ती संख्या पदोन्नती आणि सेवानिवृत्तीमुळे कमी झाली आहे आणि ऑनलाईन पध्दतीने समोरसमोर यामध्ये बदल करण्याचे काम सुरू आहे आणि असा विचार करता, त्यांच्या शाळेकडे एक नवीन शिक्षक जाणार आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, आता मागील सभेमध्ये शिक्षकांचे विषयपत्र सादर करताना, त्यामध्ये २२५ शिक्षक अतिरिक्त आहेत असे एक वाक्य होते. मागील सभेमध्ये तशी परिस्थिती असल्याचे दर्शविले होते आणि आजच्या सभेमध्ये एकदम शिक्षक संख्या कमी झाली असे आपण म्हणत आहात, तर नेमके खरे काय आहे? याबाबत माहिती द्यावी.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, एकूण विचार करता, रिक्त होते पण जे अतिरिक्त होते ते समायोजन करून ते रिक्त होतात. तसेच दुसरी बाब अशी की, यामधून ८७ जण सेवानिवृत्त झाले आणि आता जेव्हा आपल्याला भरती करावयाचे आहे ते दि.३० सप्टेंबर रोजीच्या संचमान्यतेप्रमाणे, आणि ती माहे नोव्हेंबर मध्ये मिळेल आणि त्यावेळी जी स्थिती असेल त्याप्रमाणेच आपण भरती करू किंवा शासन त्यासाठी परवानगी देईल.

मा.अध्यक्षा–आपल्याकडे ऑलरेडी रजा मुदतीमधील शिक्षक सुध्दा काम करतात त्याचे व्यवस्थापन शिक्षण मंडळामार्फत व्यवस्थित चालूच असेल मग मा.राहूल तुपेरे यांच्या प्रभागातील शाळेचे शिक्षक कमी करण्याचे कारण काय आहे?

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, त्याबाबतीत अशी परिस्थिती आहे की, आता ऑनलाईन बदल्यामध्ये त्या शाळेतून दुसरीकडे बदलून गेले आहेत आणि तिथे दोन शिक्षक बदलून आले आहेत आणि तेथे एक शिक्षक दिला गेला आहे.

मा.अध्यक्षा–आपण तिथे ताबडतोब पाहणी करून तेथे गरजेनुसार शिक्षक संख्या आणि स्टाफ संख्येची सुध्दा व्यवस्था करून द्यावी.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–मा.अध्यक्षा, मी याबाबत सहायक शिक्षणप्रमुख यांना जनता वसाहत येथील शाळेत तपासणीसाठी पाठवून तेथे शिक्षकांची व्यवस्था करतो.

मा.राहूल तुपेरे–त्यांनी तेथील सगळी परिस्थिती पाहिली आहे, आपण शिक्षक कधी उपलब्ध करून देणार आहात? याबद्दलची माहिती द्यावी.

श्री.दहीफळे,शिक्षणप्रमुख–जिथे विद्यार्थी संख्या कमी झाली असेल तेथील शिक्षक उपलब्ध करून देऊ.

मा.राहूल तुपेरे–तुम्ही वार्षिक परिक्षा झाल्यानंतर शिक्षक देणार आहात का?

मा.अनिल राणे–पुणे शहरातील प्रत्येक मनपाच्या शाळेनिहाय, प्रत्येक शाळेनुसार तेथील उपलब्ध शिक्षक आणि तेथील पटसंख्या तसेच तेथील सेवक, सेविका, वॉचमन या सगळयांच्याबाबत एक अहवाल सादर करावा. त्यामुळे आम्हाला कळू शकेल की, कोणत्या शाळेमध्ये अतिरिक्त शिक्षक आहेत? सदरचा अहवाल पुढील आठवड्यामध्ये सादर करावा.

मा.अध्यक्षा–मा.सभासदाच्या मागणीनुसार, आपण पुढील सभेत हा संपूर्ण अहवाल ठेवावा की, आपल्या पुणे महानगरपालिकेच्या एकूण शाळा किती आहेत? आणि तेथे जो स्टाफ आहे त्यामध्ये सेवकवर्ग असेल, स्टाफ असेल ती सर्व माहिती शाळेनुसार उपलब्ध करून द्यावी. त्याचप्रमाणे माध्यमिक व तांत्रिक शाळांची सुध्दा माहिती देण्यात यावी.

## दाखल विषय

**दाखल विषय क्र.१३८५**

पुणे मनपा भवन येथे विस्तारीत इमारतीचे बांधकाम करणे या कामासाठी खालीलप्रमाणे वर्गीकरणाने र.रुपये ४०० लक्ष तरतूद उपलब्ध करुन देण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्यसभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/भवन/४९१ दि.१९/१०/२०१५ चे पत्र.

मा.अविनाश बागवे–मा.नगरसचिव, हा विषय परत पाठवावा आणि दुरुस्ती करून पुन्हा मागवावा.

मा.अध्यक्षा–याबाबत भवन विभागाने माहिती द्यावी.

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)–मा.अध्यक्षा महोदया, सिंहगड क्षेत्रिय कार्यालय आणि कामगार कल्याण भवन ही टेंडर्स काढली नाही. ती अपूर्ण तरतूद होती आणि त्या कामाच्या जागा निश्चित झालेल्या नाहीत.

मा.अविनाश बागवे–ते वर्गीकरण झालेले आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्या कामाचे टेंडर निघाले आहे.

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)–परंतु उर्वरित काळामध्ये १ कोटीची तरतूद घेतली आहे. जी खर्ची पडणार आहे तीच तरतूद आपण आता घेतली आहे.

मा.अविनाश बागवे–मागील आठवड्यात, एम.पी.एस.एस्सी. बाबतचा ठराव झाला आहे.

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)–त्यामध्ये ४ कोटी रू.पैकी २ कोटी रू.चे वर्गीकरण झाले आहे.

मा.अविनाश बागवे–त्याचा आम्ही ऑलरेडी मागील आठवड्यात ठराव केला आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपल्या विभागाकडील झालेल्या कामाचा खर्च सोडून ज्या तरतुदी अद्याप वापरायच्या आहेत अशा शिल्लक निधीतून ते करून घ्या.

मा.अध्यक्षा–आता तुम्ही ठेवलेल्या डॉकेटमध्ये अशी काही रक्कम आहे का की, टेंडर काढले नाही किंवा रक्कम काढली नाही कारण काही सभासदानी ऑलरेडी विषय दिले आहेत.

मा.अविनाश बागवे–एखादा मोठा प्रोजेक्ट होणार नाही, असे काही आहे का?

मा.अध्यक्षा–आता जे विषय दिले आहे त्यामध्ये असे काही आहे का,अन्यथा हे फेरडॉकेट ठेवावे लागेल.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–अखर्चित मधून चालेल का?

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)–काम थांबू नये कारण ऑलरेडी ६ कोटी रू.खर्च झाला आहे. त्यामध्ये ४ कोटी रू.इतकीच तरतूद होती, अन्यथा काम थांबेल.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे काम चालू राहिले पाहिजे.

मा.अनिल राणे–ही इमारत झाली पाहिजे. सध्या आपल्याकडे पार्किंगची सुध्दा गैरसोय होत आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–यामध्ये अखर्चित मधून ॲडजस्ट करून देत आहेत आपण त्यासाठी सूचना द्यावी.

मा.अध्यक्षा–नगररोड क्षेत्रिय कार्यालयाची उपलब्ध तरतूद आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–नगररोडची तरतूद आपणास हवी असेल तर, आपण तशी चर्चा करावी. आम्हाला या कामासाठी बजेटमध्ये पूर्ण तरतूद द्यावी.त्यामुळे तो प्रोजेक्ट सुध्दा पूर्ण होईल.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामुळे दोन्ही विषय पूर्ण होतील.

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)–पुढील बजेटमध्ये मागणी करू.

मा.अध्यक्षा–ती जबाबदारी त्यांची राहील.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ही मागणी खात्याने केली पाहिजे.

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)–ठीक आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे १ कोटी रू.उपलब्ध होतील आणि आणखी कोणते करू शकतो?

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)– कामगार कल्याण भवन आणि सिंहगड रोड, क्षेत्रिय कार्यालय त्यामधून घ्यावेत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–या दोन्ही मधून ५०,५० लाख रू.कमी करू. सिंहगड रोडचे तर दिलेले आहे.

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)– ती जागा निश्चित झालेली नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–कुठली?

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)– ॲमेनिटी स्पेसची.

मा.अध्यक्षा–आता दीड कोटी रू.उपलब्ध होत आहेत.

मा.राजेंद्र राऊत,अधी.अभि.(भवन)– या कामासाठी दोन कोटी रू.आवश्यक आहेत. यामुळे झालेल्या कामाचे बिल देता येईल.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये नगररोड क्षे.कार्यालयाकडील कामाचे १ कोटी रू आणि सिंहगड रोड क्षे.कार्यालयाकडील कामाचे ५० लाख असे मिळून दीड कोटी रू.पर्यंत हा विषय मान्य करावा.

मा.नगरसचिव–आम्ही या प्रस्तावामध्ये पुढील प्रमाणे बदल करीत आहोत. **''मनपा नवीन इमारतीच्या बांधकामासाठी र.रू.४ कोटीचे वर्गीकरण प्रस्तावित केले होते आपण त्यातील र.रू. १ कोटी ५० लाख रू.मान्य केले आहेत. त्यामध्ये कामगार कल्याणचे ५० लाख रू.आणि नगर रोड क्षेत्रिय कार्यालयाची इमारत, र.रू.१ कोटी असे मिळून दीड कोटी रू.चे वर्गीकरण''** हे मान्य करण्यात येत आहे. सदरचा विषय आजच्या मुख्यसभेस १–के नुसार सादर करण्यात येईल.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ठीक आहे, हा विषय मान्य करावा.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून, र.रू.१ कोटी ५० लाख रू.मान्य करण्यात आले.

**दाखल विषय क्र.–१३८६**

प्रभाग क्र. ३६ अ मध्ये खिलारे शाळा क्र. ५५ व सनडयू अपार्टमेंट ई लर्निंग शाळा येथे विविध शालेय साहित्य खरेदी करणेसाठी र.रू.१५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.अनिल राणे व मा.राहूल तुपेरे यांचे दि. १९/१०/२०१५ चे पत्र.

मा.नगरसचिव–हे 'स' यादीतील आहे.
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१३८७**

प्रभाग क्र. ४० ब मध्ये पूना क्लब सर्व्हंट क्वार्टर्स येथे ड्रेनेज विषयक कामे करणे व समाजमंदिर बांधणेसाठी र.रु. २० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.अरविंद शिंदे, विरोधी पक्षनेता यांचे दि. १६/१०/२०१५ चे पत्र.
मा.नगरसचिव–हे 'स' यादीतील आहे.
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र :–१३८८**

प्रभाग क्र. २९ अ मध्ये बावधन यु.टी.डब्ल्यु.टी. रस्ता कॉंक्रीट करणेसाठी रक्कम रूपये १५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.प्रदीप गायकवाड यांचे दि. १६/१०/२०१५ चे पत्र.
मा.नगरसचिव–हे 'स' यादीतील आहे.
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१३८९**

प्रभाग क्र. २९ अ बावधन मध्ये खेळाचे मैदान तयार करणेसाठी रक्कम रूपये ५० लाखाचे अखर्चीत रक्कमेतून वर्गीकरण करण्यास मान्यता मान्यता द्यावी, याबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.रोहिणी चिमटे यांचे दि. १६/१०/२०१५ चे पत्र.
मा.ॲड.चंदूशेठ कदम–हे वर्गीकरण कशातून घेतले आहेत?
मा.नगरसचिव– हे अखर्चित रक्कमेतून घेत आहेत.
मा.अविनाश बागवे–हा निधी कोणत्या कामासाठी घेण्यात येत आहे?
मा.नगरसचिव–प्रभाग क्र.२९ अ, बावधन येथे खेळाचे मैदान तयार करणे.
मा.अविनाश बागवे– हे सभागृह नेत्यांच्या प्रभागातील आहे. हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१३९०**

प्रभाग क्र. २९ अ बावधन मध्ये स्पोर्टस क्लब करणेसाठी रक्कम रूपये ५० लाखाचे अखर्चीत रक्कमेतून वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.शंकर केमसे, सभागृह नेता व मा.रोहिणी चिमटे यांचे दि. १६/१०/२०१५ चे पत्र.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१३९१**

प्रभाग क्र. ३३ अ भेलकेनगर चौक परिसरातील रस्त्यालगत फुटपाथ करणेसाठी र.रु. १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.ॲड्.योगेश मोकाटे यांचे दि. १५/१०/२०१५ चे पत्र.
मा.नगरसचिव–हे 'स' यादीतील आहे.
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१३९२**

प्रभाग क्र. १८ ब मध्ये वडगाव शेरी, सनसिटी समोरील गार्डनमध्ये उर्वरित विविध विकास कामे करणेसाठी र.रु.२५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.योगेश मुळीक यांचे दि. १५/१०/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१३९३**

प्रभाग क्र.२० अ मुंढवा गावातील श्री क्षेत्रपाळ काळभैरवनाथ मंदिर व परिसरामध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रु. १० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.चंचला कोद्रे यांचे दि. १७/१०/२०१५ चे पत्र.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१३९४**

प्रभाग क्र.५३ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु. २.५० कोटी रू.चे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.श्रीकांत जगताप व मा.अविनाश बागवे यांचे दि. १९/१०/२०१५ चे पत्र.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– यामध्ये मा.श्रीकांत जगताप यांच्या प्रभागातील कामांसाठी २ कोटी रू द्यावयाचे आहेत आणि पुढे मा.सतिश म्हस्के यांच्या प्रभागातील कामांसाठी ५० लाख रू.उपलब्ध करून देण्याबाबतचा विषय आहे. यातील निधी दोन्ही सभासदांच्या वॉर्डातील कामांसाठी निम्मा निम्मा निधी द्यावयाचा आहे.
मा.नगरसचिव–यामुळे मा.सभासदांनी सादर केलेल्या प्रस्तावातील कामांमध्ये कपात किंवा अन्य बदल करावे लागणार आहेत. तरी कृपया याबाबत मा.सभासदानी माहिती द्यावी.
मा.श्रीकांत जगताप–आम्ही या प्रस्तावामध्ये आवश्यक ती दुरूस्ती करून मा.नगरसचिव यांच्याकडे देत आहोत.
मा.नगरसचिव– हे २.०० कोटी रू.चे वर्गीकरण दाखल मान्य होत आहे आणि १ –के अन्वये आजच्या मुख्यसभेत सादर करीत आहोत.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून र.रू.२ कोटी चे वर्गीकरण मान्य करण्यात आले.

**दाखल विषय क्र.–१३९५**

प्रभाग क्र.४८ मधील गणेशपेठ मच्छी मार्केटची इमारत बांधणेच्या उर्वरित कामासाठी रक्कम रुपये ५० लाखाचे सन २०१५–१६ चे अंदाजपत्रकातील अखर्चीत रक्कमेतून उपलब्ध करून देण्यास व त्याबाबतचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.राजश्री आंदेकर व मा.सौ.शारदा ओरसे यांचे दि. १९/१०/२०१५ चे पत्र.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१३९६**

मा.उपमहापौर कार्यालय चहापान खर्चासाठी र.रुपये ५० हजार, मा.सभागृह नेता कार्यालय चहापान खर्चासाठी र.रुपये ५० हजार, मा.विरोधी पक्षनेता कार्यालय चहापान खर्चासाठी र.रुपये ५० हजार असे एकूण र.रुपये १.५० लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी, याबाबत मा.चेतन तुपे, मा.सौ.संगिता गायकवाड, मा.प्रशांत म्हस्के व मा.सुधीर जानजोत यांचे दि. १६/१०/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते– हे स यादीतील आहे. हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१३९७**

सन २०१५–१६ चे अंदाजपत्रक, बजेट कोड सीई २२ ए ५४८/एस–२६–११६४, पान क्र.२५१, यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी.स्पर्धा परिक्षांचे वर्ग वाचनालय व अभ्यासिका ८ विधानसभा मतदार संघात सुरू करणेसाठी तरतुद उपलब्ध आहे.

तरी वरील तरतुदीतुन बाणेर येथील साईदत्त रेसिडेंसी येथील पुणे मनपा ॲमेनिटी स्पेस येथे यु.पी.एस.सी., एम.पी. एस.सी. स्पर्धा परिक्षांचे वर्ग वाचनालय व अभ्यासिका चालू करणेसाठी र.रू.५० लाख उपलब्ध करुन देण्यात यावेत, याबाबत मा.बाबुराव चांदेरे यांचे दि.१६/१०/२०१५ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–सदर प्रस्तावावर प्रशासनाचा अभिप्राय घ्यावा.
निर्णय–सदरच्या दाखल प्रस्तावावर मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.

**दाखल विषय क्र.–१३९८**

स्थायी समिती विषय क्र. ११३१ ने मान्य झालेला विषय (श्री. अजय विजय धनवडे बिगारी, नगरसचिव कार्यालय) यांना त्यांच्या मुळ खात्यात परत पाठविणे हा विषय रद्द करुन श्री.धनवडे यांना सहानुभूती दाखवून नगरसचिव कार्यालयाकडे कामास ठेवणेत यावे, याबाबत मा.रविंद्र धंगेकर यांचे दि.१७/१०/२०१५ चे फेरविचाराचे पत्र.
मा.अविनाश बागवे–याबाबत नगरसचिव कार्यालयाने अभिप्राय द्यावा.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय पुन्हा पुन्हा येत आहे. मा.नगरसचिव, आपल्याला याबद्दल काय वाटते? याची माहिती द्यावी.
मा.नगरसचिव–शिक्षा ही व्हायला पाहिजे आणि आपण शिक्षेऐवजी आपण त्याची बदली करीत आहोत. आपण असे न केल्यास आपला त्यांच्यावर कंट्रोल राहत नाही.
मा.अविनाश बागवे–या विषयाबाबत मा.नगरसचिव यांनी पुढील सभेमध्ये अभिप्राय द्यावा.
निर्णय–सदर दाखल प्रस्तावावर मा.नगरसचिव यांनी अभिप्राय द्यावा.

**दाखल विषय क्र.– १३९९**

सर्व प्रभागातील ड्रेनेज विषयी कामे न करणे, सभासदांसोबत गैरवर्तन करणे, उडवा–उडवीची उत्तरे देवून काम टाळणे अशा गंभीर स्वरुपाची तक्रारी असल्याने संबंधित अधिकारी मा.श्री.बेलदार यांची चौकशी करुन कडक कारवाई करण्यास मान्यता देण्यात यावी, याबाबत मा.बापूराव कर्णे (गुरूजी), मा. सौ. राजश्री आंदेकर, मा.सौ.शारदा ओरसे, मा. शंकर केमसे, सभागृह नेता, मा. राहुल तुपेरे, मा. अनिल राणे, मा.मुकारी अलगुडे, मा.श्रीकांत जगताप, मा.सौ.मुक्ता टिळक,मा.अविनाश बागवे, मा.ॲड्.रामचंद्र उर्फ चंदुशेठ कदम व मा.सौ.दिपाली ओसवाल यांचे दि. १९/१०/२०१५ चे पत्र.
मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये विधी खात्याचा अभिप्राय घ्यावा लागेल का?
मा.अध्यक्षा–हा सभासदानी दिलेला प्रस्ताव आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–मा.अध्यक्षा, स्थायी समितीला अशा पध्दतीने द्यावे लागणे हे मुळात प्रशासनासाठी योग्य नाही. याबाबतीत तुमचे म्हणणे काय आहे? ते सांगा.
मा.राहूल तुपेरे–कायदेशीर होईल का? ते सांगावे.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–मा.चेअरमन, अधिकाऱ्यांच्या वागणूकीबाबत मर्यादा आहेत की, प्रत्येक वेळी मा.अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्यांशी चर्चा करताना सौम्य शब्दात चर्चा केली पाहिजे. यामध्ये जर असे झाले असेल तर ही बाब नक्कीच दुर्दैवी

आहे. पण त्यांचे बाकीचे जे काम आहे. ते कुठे, कुठे कोणकोणत्या स्टेजवर आहे? किती वर्कऑर्डर झाल्या आहेत? त्यांचे डाक्युमेंटस काय आहेत? त्या आधारावर आम्ही पुढील सभेमध्ये करंट स्टेटसचा रिपोर्ट देणार आहोत.

मा.अविनाश बागवे–आपण करंट स्टेटस देत आहात, परंतु मा.श्रीमती नीलम कुलकर्णी यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे की, सन २०१४–१५ चे बजेट खर्ची पडावे म्हणून त्यांनी इतका पत्रव्यवहार केला, त्यांनी वाहतूक शाखेची परवानगी मिळविण्यासाठी मा.उपायुक्त (वाहतूक शाखा) यांच्याकडे पाठपुरावा केला आणि असे असताना जर राजकीय दबावामुळे ठेकेदाराला जर कोणी काही करीत असेल तर अशा वेळी ती खात्याची जबाबदारी असते की, तो ठेकेदार नसेल तर दुसरा ठेकेदार घ्यावा. अशावेळी त्यांनी खात्याच्या माध्यमातून काम करावे किंवा दुसऱ्या ठेकेदाराकडून करवून घ्यावे, असे काहीतरी केले पाहिजे. त्यांना वर्कऑर्डर दिली असताना देखील ते काम करीत नाही व हे काम करताना असे चुकीच्या पध्दतीने काम करणे. खाजगी संस्थांचे रिपोर्ट मागविणे. आपण मागणी करूनही ई.आय.एल.चे रिपोर्ट न सादर करणे. याबाबत मा.सभासदानी विचारपूस केली असता, त्यांनाच खात्याने पत्र दिले की, तुम्ही कामामध्ये अडथळे निर्माण करीत आहात. मा.अति.आयुक्त साहेब, यापेक्षा आणखी चुकीचे काय असू शकेल?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–मागील वर्षी जेवढे काम झालेले आहे आणि किती कामे लॅप्स झाली आहेत? आम्ही त्याचा पूर्ण आढावा घेतो संबंधित डिपार्टमेंटकडून घेतो आणि मा.सदस्याचे जसे म्हणणे होते की, टेस्टींग रिपोर्ट. या टेस्टींग रिपोर्टमध्ये काय आहे? ते मी एकदा वाचून घेतो.

मा.अविनाश बागवे–ते प्रॉयव्हेट कंपनीचे आहे.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–त्यांच्याकडे जी अॅथोरॉईज्ड कंपनी असेल ती प्रत्येक पाईपचा टेस्टींग रिपोर्ट घेते तो टेक्नीकल टेस्ट रिपोर्ट काय आहे? तो सध्या माझ्याकडे नाही आणि टेक्निकल टेस्ट रिपोर्टमध्ये असे असेल की, ते काम सबस्टॅर्डडचे काम आहे तर नक्कीच आपण त्याबाबत नक्कीच कारवाई करू.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– हे पत्र आणि या पत्रांमध्ये तारखांचा घोळ आहे म्हणजे हे पत्र तयार करताना हे जाणीवपूर्वक उशीराने केले आहे. ते एक महिना उशीराने पाठविले आहे. एका महिला नगरसेविकाला हॅरेसमेंट करण्याचा, हा प्रकार नाही का? आज आपल्याकडे ही समिती मागणी करीत आहे व ती यासाठी करीत आहे की, एक महिला नगरसेविका सक्षमपणे काम करायचा प्रयत्न करीत आहे. त्यांचे काम पूर्णपणे केले जात नाही. ते काम अर्धवटच राहते आणि याबाबत रिपोर्टची मागणी केली असता, तो सुध्दा सादर केलेला नाही आणि हे या खात्याचे असे एकच उदाहरण आहे का? यामध्ये फक्त मा.नगरसेविका यांचीच अडचण आहे का? तर तसे सुध्दा नाही. मा.अध्यक्षा, स्थायी समिती यांचे प्रभागात सुध्दा अशी बाब झाली आहे. त्याही महिला नगरसेविका आहेत आणि त्या मोठ्या पदाधिकारी आहेत. त्यांच्याकडेही तशीच तक्रार आहे तसेच जेष्ठ, मा.सभासद, अॅड.कदम साहेब यांनी त्यांच्या प्रभागातील ड्रेनेजच्या कामाबाबत जी परिस्थिती आहे त्यांनी आपणास सदर ठिकाणचे व्हिडीओ शुटींग दाखविले आहे. तसेच मा.दिपाली ओसवाल यांच्या प्रभागात सुध्दा तीच परिस्थिती आहे. यामध्ये तीन महिला सभासद, मा.पदाधिकारी यांची तक्रार आली आहे आणि हे सगळे पाहून आपण जर म्हणणार असाल की, आम्ही याबाबत माहिती घेऊ . मा.अति.आयुक्त साहेब, यामध्ये माहिती वैगेरे काही घेऊ नये आणि त्यांच्यावर ताबडतोब कारवाई करावी. तुम्हाला जे काय करावयाचे असेल, ते त्यानंतर करावे. त्यामध्ये आम्हाला काही अडचण येणार नाही. परंतु आपण जर असे केले नाही तर, अडचण होईल.

मा.अविनाश बागवे–मा.आयुक्त साहेब, हे असे आहे की, नगरसेवकांची कामे करायची नाहीत आणि यामुळे जास्तीत जास्त असे होईल की, नगरसेवक ओरडतील आणि गप्प बसतील किंवा मा.स्थायी समितीमध्ये बोलतील किंवा मा.मुख्यसभेमध्ये बोलतील आणि गप्प बसतील आणि आणखी काही जास्त झाले तर संबंधीत कार्यकर्ते येतील, नागरीक येतील आणि ओरडतील आणि जर हा प्रकार जास्त झाला तर शासकीय कामात अडथळा निर्माण केला असे म्हणण्यासाठी ते बसलेच आहेत किंवा मग त्यांचा एखादा ग्रुप येऊन तुम्हाला भेटणार की, आम्हाला खूप मानसिक त्रास होत आहे. परंतु त्यांच्याकडून जी हॅरेशमेंट केली जाते त्याचे काय? त्याबद्दल तुम्हाला कोणीही काही विचारणार नाही का? यामध्ये तुमचे उत्तरदायित्व नाही का? मा.अति.आयुक्त साहेब, यामध्ये आपण काहीतरी स्ट्रीक्ट अॅक्शन घ्यावी.

मा.अध्यक्षा–या सगळयावर एका वाक्यात उत्तर देणे हा केवढा मोठेपणा आहे. यासाठी त्यांचे कौतुक करावे की, अभिनंदन करावे? संबंधित महिला नगरसेविका या कामासाठी दोन वर्षापासून पाठपुरावा करीत होत्या आणि तुम्ही यावर एका वाक्यात उत्तर दिले की, तुम्ही आमच्या खात्याला डिस्टर्ब करीत आहात. त्या वेड्या आहेत का? नगरसेविकांना काही उद्योगच नाहीत त्या उगाचच येतात आणि नागरीकांसाठी बजेट मध्ये कामे टाकत आहेत. त्या स्वत: वेगवेगळया खात्यांचा पाठपुरावा करून तुम्हाला आयत्या एन.ओ.सी. आणून देत आहेत. त्या भागातील सन्माननीय सदस्या तुम्हाला सहकार्य करून, त्या वेडेपणा करीत आहेत आणि तुम्ही त्यांना एका ओळीत लिहून देता की, तुम्ही आमच्या खात्याला डिस्टर्ब करीत आहात.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– त्यांनी दि.७/२,दि.१३/२, दि.६/४, दि.१५/५, दि.३०/५, दि.१४/८ अशी एकूण ७ पत्रे दिली आहेत. हे सगळे समोर आहे.

मा.अविनाश बागवे–त्यांना पत्र आले तरी त्यांना कसला त्रास होतो? हा त्यांचा फालोअप आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– हा नाहक त्रास कसा होईल?

मा.अध्यक्षा–त्यांच्यावर कारवाई करावी.

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षा, आपण त्यांना यावेळी संधी देऊ.

मा.अॅड.चंदूशेठ कदम–मा.अध्यक्षा, असे नाही.

मा.राजेंद्र शिळीमकर–माझे ऐका, आपण पहा की, हे एकच अधिकारी अशा पध्दतीने वागतात असे नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–सगळे असतील तर, सगळे पाठवू.

मा.राजेंद्र शिळीमकर–वर्तमानपत्रामध्ये बांधकाम खात्याच्याबाबत सलग पानेच्या पाने छापून येतात त्यामुळे महापालिकेची बदनामी होते. त्या विषयी कोणीही चकार शब्द बोलत नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये आपल्या तीन, तीन भगिनी आहेत आणि त्यांना त्यांचा त्रास होत आहे. त्यांना अडचण निर्माण होते, यावर गंभीर चर्चा झाली आहे.

मा.सौ.दिपाली ओसवाल–तुमच्या भागात सुध्दा नाला आहे.

मा.राजेंद्र शिळीमकर–आमच्या भागात सुध्दा नाला आहे. मी त्या विषयी अनेकवेळा बोलतो पण त्याचा अर्थ असा नाही की, थेट शिक्षा करावी.
मा.सौ.दिपाली ओसवाल–आमच्या भागातील नाला पहा, तिथे लोकांनी कसे रहायचे?
मा.राजेंद्र शिळीमकर–तोच नाला आमच्या भागात सुध्दा वहात येतो.
मा.सौ.दिपाली ओसवाल–आपण त्यांना यासाठी किती वेळा बोलायचे?
मा.राजेंद्र शिळीमकर–त्यांची बदली करा आणि दुसऱ्या सक्षम अधिकाऱ्याकडे चार्ज द्यावा.
मा.अध्यक्षा–याबद्दल प्रशासन योग्य तो निर्णय घेईल. आम्हाला सुध्दा प्रशासनातील सगळ्या अधिकाऱ्याबद्दल आपुलकी असते. ही त्यांनी मिळविलेली नोकरी असते. आपल्याला त्यांच्यावर कारवाई करायची नाही परंतु त्यांची काम करण्याची मानसिकता नसेल तर कोण काय करू शकते?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.चंदूशेठ कदम यांच्या प्रभागातील कामाबद्दल १० वेळा सांगितले परंतु ते काम करायलाच तयार नाहीत.
मा.राजेंद्र शिळीमकर–यामध्ये वरिष्ठांची सुध्दा जबाबदारी आहे की, त्यांनी तिथे दुसरा सक्षम अधिकारी दिला पाहिजे.
मा.अध्यक्षा–आपण त्यांना कितीवेळा संधी द्यायची? बजेट लॅप्स होऊन जाते तरी सुध्दा ती कामे होत नाही. त्यांना स्वत:ला हे आवडत नाही का? तिथे जायला पाहिजे. आपली जबाबदारी सांभाळायला पाहिजे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ही कारवाई होऊ द्यावी. तुमच्या राज्यामध्ये अधिकाऱ्यांनी काम केले नाही तर त्यांच्यावर कशी कारवाई होते? हे दाखविण्याची वेळ आली आहे आणि तुम्ही मागे फिरत आहात. तुमच्या राज्यात कडक प्रशासन दिसले पाहिजे.
(सभागृहात गोंधळ सुरू होता)
मा.राजेंद्र शिळीमकर–त्या खात्यासाठी दुसरे अधिकारी बदलून घ्यावेत. आता आपण लगेच त्यांना बडतर्फ करावे, हे असे योग्य नाही.
मा.अविनाश बागवे–यामध्ये अनेक विषय आहे. मी सुध्दा कामासाठी अनेक महिन्यांपासून अतिक्रमण विभागाकडे पाठपुरावा करीत आहे म्हणून आपण त्यांच्यावर कारवाई करीत नाही. परंतु या खात्याच्या बाबतीत हा विषय गंभीर आहे आणि तीन, चार जणांनी खूप गंभीर आरोप केले आहेत.
मा.राजेंद्र शिळीमकर– बांधकाम विभागाचे विषय किती गंभीर आहेत ते माहिती आहे का?
मा.अविनाश बागवे–जे, जे आहेत त्या सर्वांवर कारवाई करूच.
मा.राजेंद्र शिळीमकर– खरे म्हणजे, कोणाच्या तरी पांघरूणाखाली छुपा कार्यक्रम सुरू असतो, त्यांना काही नाही.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.आबा,सभासदांना अडचणीची वेळ असेल तर आपण त्यांच्यासाठी उभे राहिले पाहिजे आणि त्याबाबत तुम्ही उलटा पुढाकार घ्यायला पाहिजे.
मा.अविनाश बागवे–मा.आयुक्त साहेब, त्यामागील उद्देश एवढाच आहे की, सर्वांची कामे झाली पाहिजेत.
मा.राजेंद्र शिळीमकर–मा.सभागृहनेते, त्यातील बडतर्फ हा शब्द वगळा.
मा.अविनाश बागवे–त्यांनी नागरीक व सभासद यांचेसह नीट बोलले पाहिजे.
मा.नगरसचिव–यामध्ये मा.अध्यक्षा, यांच्या आदेशानुसार पुढीलप्रमाणे बदल केला आहे की,''त्यांच्याबाबत गंभीर स्वरूपाच्या तक्रारी असल्याने ही समिती, श्रीयुत बेलदार यांची चौकशी करून कडक कारवाई करावी, अशी मागणी करीत आहे.''
मा.अध्यक्षा–मा.बेलदार साहेब, तुम्ही एका गोष्टीची गांर्भीयाने दखल घ्यावी की, केवळ तुमच्या नोकरीला कुठल्याही प्रकारचे गालबोट लागू नये म्हणून सर्व सभासदाच्या विचारविनिमयाने आम्ही आज असा निर्णय घेत आहोत. वास्तविक पाहता ही वेळ आणणे सुध्दा चुकीचे आहे. सभासद जेवढे कडक वागू शकतात तेवढे ते सौम्य सुध्दा वागू शकतात पण तुम्ही तुमच्या कर्तव्याशी बिलकूल एकनिष्ठ रहात नाही, या गोष्टीची याठिकाणी खंत व्यक्त करावीशी वाटते आणि तुम्ही अजूनही शहाणे व्हा, कारण आम्ही आता सर्वांच्या विचारविनिमयाने तुमच्यावरील निलंबनाची कारवाई टाळली आहे आणि ते तुम्ही नशीब समजा आणि त्यादृष्टीने आता कामाला सुरूवात करा.
मा.अध्यक्षा–त्यांची त्या खात्यातून बदली करावी.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्यांना त्या खात्यामध्ये ठेवायचे नाही. कारवाई म्हणजे काय? तर ताबडतोब त्यांची त्या खात्यातून बदली करा अन्यथा हा नुसता फार्स होईल.
मा.अध्यक्षा–यामध्ये ड्रेनेज विभागामध्ये जो कोणी सक्षम अधिकारी असेल त्यांची याठिकाणी ताबडतोब नियुक्ती करावी. याबाबत पुणे शहरातील सर्व भागातून तक्रारी येत असतात यामध्ये जी काही कामे आहेत ती मार्गी लावण्यासाठी तुम्ही पावले उचलावीत.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.
मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षा,आपल्याकडील बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांच्या संदर्भात वर्तमानपत्रातून अनेक वेळा छापून येते त्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली? याबाबतची माहिती द्यावी.
मा.अध्यक्षा–ही चर्चा पुढील सभेत घ्यावी. सुरूवातीला या संदर्भात आम्ही सर्वांनी चर्चा केली होती आणि तुम्ही त्यावेळी अनुपस्थित होते आणि आज मा.मुख्यसभा सुध्दा आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–पुढील विषय घ्यावेत.
मा.राजेंद्र शिळीमकर–बांधकामबाबतची माहिती द्यावी.
मा.अध्यक्षा–आजच्या सभेस मा.नगरअभियंता आणि मा.आयुक्त साहेब, उपस्थित नाहीत.
मा.राजेंद्र शिळीमकर–मा.अध्यक्षा, याबाबत मा.अति.महा.आयुक्त, बकोरिया साहेब माहिती देतील.
मा.अध्यक्षा–आज आता मा.मुख्यसभा सुध्दा आहे, पुढील विषय घ्यावा.

**दाखल विषय क्र.–१४००**

प्रभाग क्र. २० मधील स.नं. १६४ मधील नियोजीत ग.प्र.प्रधान उद्यानामध्ये विकसनाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ११ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.मृणाल असोसिएट्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४८,३९,६६८=९२ पेक्षा २१.८५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३७,८२,२०१=२६ पर्यंत काम करून घेणेस तसेच भाववाढ सुत्रानुसार (टेंडर अटी शर्तीनुसार) दरात

होणारी वाढ/घट त्यानुसार येणारी रक्कम ठेकेदारास आदा/वसूल करणेस यांस अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा. क्र. मआ/उद्यान/४७२ दि.१४/१०/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१४०१**

प्रभाग क्र. ६३ अ मधील विविध ठिकाणी विविध विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९९,८५२/– पेक्षा २०.८४% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७९,१५,८८२=८४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४७५ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१४०२**

प्रभाग क्र. ७३ मधील बालाजीनगर परिसरामध्ये निवारा सोसा. साईकृपा सोसा, हिल पॉईंट सोसा. परिसरामध्ये रस्ते विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४७,६४,५६८/–पेक्षा १८.४२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८,८६,९५९=०४ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४७६ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.– १४०३**

पुणे मनपा पथ विभागामार्फत राबविणेत येणाऱ्या निरनिराळया पुलांचे व रस्त्यांचे कामाकरीता मे.नोबल इंटरेस्ट कन्सल्टींग इंजिनिअर यांचे तज्ञ सल्लागारांच्या पॅनेलमध्ये वर्ग (II)(प्रोजेक्ट र.रुपये ५.०० ते २०.०० कोटीपर्यंत) मे.नोबल इंटरेस्ट कन्सल्टींग इंजिनिअर यांचे मा.स्थायी समितीने यापुर्वी मान्य केलेल्या संदर्भ क्र. १ च्या ठरावामध्ये बदल करुन मे.नोबल इंटरेस्ट कन्सल्टींग इंजिनिअर यांचे वर्ग (I)मधून पुढील टप्प्यात वर्ग (II) साठी निवड करणेसाठी मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४७७ दि.१७/१०/२०१५ चे पत्र.
मा.नगरसचिव–हे प्रशासनाचे डॉकेट आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी– हे श्रेणी वाढ आहे, हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र. –१४०४**

Carrying out O&M Work for a Period of Five Years at 5 TPD Biomethanation Plant ( To Process Segregated Organic Biodegradable Municipal Solid Wastes) Installed at Bavdhan Pune. B-2 Tender) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.एईशान बायोटेक यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून प्रकल्पाच्या विविध विकास कामासांठी र.रु.२६,००,०००/– व ५ वर्षासाठी देखभालीचा खर्च र.रु.१,१४,००,०००/– असे एकुण १,४०,००,०००/– चे टेंडर प्राप्त झाले असून फक्त तडजोडी अंतर्गत प्रकल्पाच्या विविध विकास कामासांठी र.रु.५,२०,०००/– व ५ वर्षासाठी देखभालीचा खर्च र.रु. ८७,६६,९३०/– असे एकुण ९२,८६,९३०/–(अक्षरी र.रु. ब्याण्णव लक्ष श्याऐंशी हजार नऊशे तीस रु. फक्त ) सर्वकरांसहित चे टेंडर प्राप्त झाले असुन या रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचे बरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/४७८ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–हे कोणाच्या प्रभागातील आहे?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे टेंडर आहे.
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१४०५**

प्रभाग क्र. ७३ मधील एलोरा पॅलेस ते हनुमान सुपर मार्केट परिसरामध्ये रस्ते विकसीत करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सनराज कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९५,२९,२०१/– पेक्षा १९.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७६,८०,५३६/– पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/४८० दि. १७/१०/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१४०६**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/४८२ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात यावेत.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून, याबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात आले.

**दाखल विषय क्र.–१४०७**

रक्कम रू. ४२ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/४८३ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात यावेत.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून, याबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात आले.

**दाखल विषय क्र.–१४०८**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/४८४ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात यावेत.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून, याबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात आले.

**दाखल विषय क्र–१४०९**

रक्कम रू. ४२ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/४८५ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात यावेत.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून, याबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात आले.

**दाखल विषय क्र.–१४१०**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/४८६ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात यावेत.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून, याबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात आले.

**दाखल विषय क्र.–१४११**

रक्कम रू. ४२ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/४८७ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.

मा.सौ.मुक्ता टिळक–मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात यावेत.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून, याबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात आले.

**दाखल विषय क्र.–१४१२**

रक्कम रू. २१ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/४८८ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, यांना अधिकार देण्यात यावेत.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून, याबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात आले.

**दाखल विषय क्र.–१४१३**

रक्कम रू. ४२ कोटी १२ महिने मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/४८९ दि. १७/१०/२०१५ चे पत्र.

मा.सौ.मुक्ता टिळक–मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात यावेत.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून, याबाबत मा.अध्यक्षा यांना अधिकार देण्यात आले.

मा.अविनाश बागवे–मा.पारखी साहेब, या गुंतवणूक रक्कमेची एकूण बेरीज किती आहे?

मा.नगरसचिव–याबाबतची माहिती सभेनंतर उपलब्ध करून देऊ.

**दाखल विषय क्र.–१४१४**

कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडील अंदाजपत्रक सन २०१५–१६ मधील खालीलप्रमाणे वर्गीकरणाने र.रुपये ३८.०८ लाख व र.रुपये ४५.८० लाख असे एकूण ८३.८८ लाखाची तरतूद उपलब्ध करुन देण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/टिजीओ/४९० दि.१७/१०/२०१५ चे पत्र.

मा.अविनाश बागवे–हे कशासाठी आहे? याबाबत माहिती द्यावी.

मा.नगरसचिव–हे प्रशासनाचे डॉकेट आहे. अधिकारपत्र, वारंट, वसूली खर्च इ. बाबत आहे.

मा.अविनाश बागवे–हे टॅक्स विभागाचे आहे, हे मान्य करावे.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.

**दाखल विषय क्र.–१४१५**

प्रभाग क्र.३७ ब मध्ये खालील कामासाठी रक्कम र.रु.२ कोटी सन २०१५–१६ चे अंदाजपत्रकातील अखर्चीत रक्कमेतून उपलब्ध करून देण्यास व त्याबाबतचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देण्यास मान्यता द्यावी, याबाबत मा.सौ.मुक्ता टिळक व मा.श्रीमती नीलम कुलकर्णी यांचे दि. १९/१०/२०१५ चे पत्र.
१) अष्टभूजा मंदिर ते पुलाची वाडी या दरम्यान सबमर्सिबल पादचारी पूल बांधण्यास मान्यता द्यावी.र.रु.५० लाख
२) वर्तक उद्यान व नाना–नानी उद्यान येथे विविध विकास कामे करण्यात यावी.र.रु.३० लाख
३) घनकचरा व्यवस्थापनासाठी कॉम्पॅक्टर खरेदी करणे.र.रु.२० लाख
४) संभाजी पोलीस चौकीच्या नुतनीकरणासाठी र.रु.२० लाख
५) मजूर अड्डा येथे वाहनतळ विकसीत करणे.र.रु.८० लाख
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते दाखल करून मान्य करण्यात आला.
**विषय–**

प्रभाग क्र.४० ब मध्ये जुनी जिल्हा परिषद ते नवीन जिल्हा परिषद रस्ता यु.टी.डब्ल्यु.टी.पध्दतीने कॉक्रीटीकरण करेणसाठी र.रू.३ कोटीचे वर्गीकरण मान्यता द्यावी, याबाबत मा.अरविंद शिंदे, विरोधी पक्षनेते यांचे दि.१६/१०/२०१५ चे पत्र.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– या विषयाबद्दल माहिती घ्यावयाची आहे त्यामुळे हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.अविनाश बागवे–हा त्यांच्याच प्रभागातील विषय आहे. हा विषय मान्य करावा.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– या विषयाबाबत माहिती द्यावी.
मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–अलंकार थिएटरच्या बाजूला सिग्नलजवळ रेल्वे ट्रकवर जो पूल आहे. तेथील कामासाठी टेंडर काढले आहे काम चालू आहे परंतु कोर्टाचा स्टे आहे. कोर्टाचे हिंअरीग चालू आहे आणि मागील दोन आठवड्यापासून हा दावा पुढील आठवड्यात निर्णय देऊ, असे म्हंटले आहे आणि एखाद्यावेळी जर कोर्टाने आपल्या बाजूने निकाल दिला तर हे काम पूर्ण होऊ शकते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा निधी आवश्यक आहे का?
मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–ते कोर्टाच्या निर्णयावर अवलंबून आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– त्यांच्या म्हणण्यानुसार, या आठवड्यामध्ये कोर्टाची ऑर्डर झाली तर पैसे द्यावे लागणार आहेत.
मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–ठेकेदाराला ॲपाईंट केले आहे गरडल्स आणून काम सुरू करावयाचे आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–याबाबत चर्चा करून निर्णय घ्यावा. सदरचा विषय पुढील सभेच्या कार्यपत्रिकेवर घेण्यात यावा.
**विषय–**

पुणे शहरातील वाहतूक नियोजन यांच्या सहाय्याने पुणे शहरातील एकात्मिक सायकल आराखडा तयार करणे (बी–२ पध्दतीने ) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.इनोव्हेटीव्ह ट्रान्सपोर्ट सोल्युशन प्रा.लि.यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून र.रू.१,१५,००,०००/–पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/पथ/४७९ दि.१७/१०/२०१५ चे पत्र.
मा.अविनाश बागवे–हा विषय कार्यपत्रिकेवर घ्यावा.

**<u>कार्यपत्रिकेवरील विषय</u>**

विषय क्र.१३४८
मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेण्यात आली.
**निर्णय–**मा.उप आयुक्त(घ.क.व्यवस्थापन) कार्यालयाकडून पाठविलेल्या अहवालाची अवलोकन करून नोंद घेण्यात आली.
विषय क्र.१३४९
मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेण्यात आली.
**निर्णय–**मा.उप आयुक्त, प.मं.कार्या.१ यांनी पाठविलेल्या अहवालेचे अवलोकन करून नोंद घेण्यात आली.
विषय क्र.१३५०
मा.अध्यक्षा–सदर विषयाबाबत मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.
**निर्णय–**सदर विषयाबाबत मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.
विषय क्र.१३५१
मा.अविनाश बागवे– सदर विषयाबाबत मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.
**निर्णय–**सदर विषयाबाबत मा.महा.आयुक्त यांनी अभिप्राय द्यावा.
विषय क्र.१३५२
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३५३
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१३५४
मा.अध्यक्षा–सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३५५
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३५६
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३५७
मा.अध्यक्षा–सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३५८
मा.अध्यक्षा–सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–** सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३५९
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३६०
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३६१
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय मान्य करण्यात यावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३६२
मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेण्यात आली.
**निर्णय–**मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे कार्यालयाकडून पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करून नोंद घेतली.
विषय क्र.१३६३
मा.अध्यक्षा–अहवालाची नोंद घेण्यात आली.
**निर्णय–**मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे कार्यालयाकडून पाठविलेल्या अहवालाचे अवलोकन करून नोंद घेतली.
विषय क्र.१३६४
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.
मा.सौ.दिपाली ओसवाल–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
मा.अविनाश बागवे–या विषयाबाबत पुढील मा.स्थायी समितीमध्ये प्रशासनाकडून प्रेझेंटेशन द्यावे आणि आमच्या ज्या सूचना असतील, त्यांचा देखील यामध्ये समावेश करावा.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये आमच्या सर्वांचे एकमत आहे की, त्यामध्ये क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या पुतळयाबाबत काय करणार आहात का?
मा.मुकारी आण्णा आलगुडे–मा.सभागृहनेते आपण विषय मान्य करून त्यांच्याशी चर्चा करून ते ठरवावे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आमचा इंटरेस्ट पुतळयाच्या संदर्भात आहे.
मा.अविनाश बागवे–बरोबर आहे, आमचेही तेच आहे.
मा.अध्यक्षा–पुतळयांच्या संदर्भात जे काही सुशोभिकरण असेल, त्यावर मेघडंबरी असेल किंवा ती शिडी भयानक आहे. त्या संदर्भामध्ये काही असेल. मा.अति.आयुक्त साहेब, आपण या सुशोभिकरणासाठी डॉकेट सादर करीत आहात आणि दुसरीकडे आपण विविध खात्यांना पत्रव्यवहार करीत आहात की, सुशोभिकरण करू नये. यावर मा.सभासद चर्चा करण्यात येणार होती.
मा.अविनाश बागवे–याबाबत मागील सभेत चर्चा झाली होती आणि यावर प्रशासन परिपत्रक देणार होते.
मा.श्रीकांत जगताप–आज मा.मुख्यसभा आहे त्यामुळे हे प्रेंझेटेशन पुढील सभेत द्यावे.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३६५
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय मान्य करावा.
**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३६६
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय–**सदर विषयाबाबत पुढील सभेत विचार करावा.

विषय क्र.१३६७
मा.अविनाश बागवे–सदरचा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३६८
मा.श्रीकांत जगताप–या विषयामध्ये एक उपसूचना आहे की, यामध्ये एक ७२ लाखाचे काम आहे. त्यामध्ये फक्त हिंगणेखुर्द केले आहे. तिथे हिंगणे खुर्द वडगाव असे करावे.
मा.नगरसचिव–हिंगणे खुर्द व वडगाव कॅनाल येथे उद्यान विकसीत करावे.
मा.श्रीकांत जगताप–यामध्ये जो शेवटचा विषय आहे, हिंगणे खुर्द आणि वडगाव बु.हे कॉमन आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–त्यामध्ये फक्त हिंगणे खुर्द हवे आहे का?
मा.श्रीकांत जगताप–होय. फक्त हिंगणे खुर्द करावयाचे आहे.
मा.अध्यक्षा–परंतु हे डॉकेट खात्याकडून ठेवले आहे. मागील सभेत सुध्दा असे केले होते. यामुळे पुन्हा फेरविचार येतो आणि ते पुन्हा सादर करतात. याबद्दल ते काहीही बोलले नाहीत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा मुद्दा मा.विकास दांगट यांच्या प्रभागाशी संबंधीत आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये बदल करू नये.
मा.श्रीकांत जगताप–हे काम ७२ लाख रू.चे आहे आणि हे उद्यान संपूर्ण १२ एकर क्षेत्रामध्ये आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.दांगट यांचे काम पूर्ण होऊ द्यावे.
मा.श्रीकांत जगताप–यामुळे असे होत आहे की, मुख्य खात्याचे बजेट एकाच ठिकाणी वापरले जात आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–उद्यान अधीक्षक यांनी या विषयाची माहिती द्यावी.
मा.घोरपडे,उद्यान अधीक्षक–यामध्ये खात्याचे ७२ लाखाचे बजेट असले तरी त्यातील ३६.४० लाख रू.मधूनच हे काम करता येणार आहे. बाकी सर्व स यादीतील आहे आणि अंदाजपत्रकामध्ये वडगाव बु.असेच बजेट हेड आहे. याबाबत असे करता येईल का? याची माहिती मा.मुख्यलेखापाल यांच्याकडून घ्यावी लागेल.
मा.अध्यक्षा–हे त्यांच्या प्रभागातीलच आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.सभासद त्यांची उपसूचना मागे घेत आहेत.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३६९
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३७०
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३७१
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३७२
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदरचा विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१३७३
मा.बापूराव कर्णे गुरूजी– हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक– मा.अध्यक्षा, यामध्ये महापालिकेचा रस्ता आहे की, हा बाहेरचा रस्ता आहे? याबाबत माहिती द्यावी.
मा.राजेंद्र राऊत, अधी.अभि.(भवन)–मा.अध्यक्षा, महोदया हा महानगरपालिकेच्या हद्दीतील रस्ता आहे. त्यापुढे नऱ्हे गावांची हद्द सुरू होते.आपण धायरी ते नऱ्हे फक्त करीत आहोत आणि त्यापुढील रस्ता करीत नाही.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३७४
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३७५
मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदरचा विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
विषय क्र.१३७६
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक– हा विषय पुढील सभेत घ्यावा.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, हा विषय जर पुढे घ्यायचा असेल तर एका बाजूला आपल्या उत्पन्नावर स्टे आणि जाहिराती मात्र चालू आहे आणि हा कसला प्रकार आहे? हे काही कळत नाही.
मा.श्रीकांत जगताप–हे कोर्टप्रकरण चालू आहे, यावर आपण कसे काय बोलू शकतो?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण बोलू शकतो.
मा.सौ.मुक्ता टिळक– नाही, कोर्टाकडे चालू असलेल्या विषयाबाबत आपण कसे बोलणार? आपण बोलू शकत नाही.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–यापूर्वी काही प्रॉपर्टीजच्या बाबतीत कोर्टप्रकरणे चालू असताना देखील आपण इथे त्याची विल्हेवाट लावणेबाबतचे ठराव आपल्याकडे आहेत.
मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय पुढे घ्यावा.
मा.अविनाश बागवे–हा विषय पुढे घेऊ नये, आपले उत्पन्नाची बाब आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मनपाच्या उत्पन्नाची बाब रोखली आहे आणि जाहिरातीची बाब मात्र चालू आहे.
मा.श्रीकांत जगताप–जाहिरात कुठे चालू आहे?
मा.बापूराव कर्णे गुरूजी –चालू आहेत.
मा.श्रीकांत जगताप–मग, असे बरेच आहेत.
मा.अविनाश बागवे–मा.अति.महा.आयुक्त, बकोरिया साहेब, यावर दोन महिन्यापूर्वी सुध्दा चर्चा झाली होती आणि हा विषय ५ ते ६ वेळा पुढे गेलेला आहे आणि त्यावेळेस आम्ही सांगितले होते की, जर यामध्ये कोर्टकेस असेल आणि आपण जर कोणतीही कारवाई करू शकत नसेल तर स्टेटस्को प्रमाणे त्यांनाही त्याठिकाणी जाहिरात करून द्यायची नाही. याबाबत संबंधित खात्याने, आम्ही तपासून पाहतो असे सांगितले होते. परंतु तसे काही दिसत नाही.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हे सुप्रा कोण आहेत ?
मा.सौ.मुक्ता टिळक–याबाबत विधी खात्याचा अभिप्राय द्यावा.
मा.रविंद्र थोरात, विधी अधिकारी–मा.अध्यक्षा साहेब, आपण कोर्टामध्ये ॲप्लीकेशन केले आहे आणि त्यांचे तेवढे ड्युज आहेत ते रिकव्हरसाठी कार्पोरेशनकडे जमा करावेत, असा आपण अर्ज केलेला आहे.
मा.शंकर केमसे, सभागृहनेते–हे सुप्रा कोण आहेत ?
मा.सौ.मुक्ता टिळक–परंतु कोर्टाने काही आदेश दिले आहेत का?
मा.रविंद्र थोरात (विधी अधिकारी)–नाही, त्यावर हिअरींग व्हायचे आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्यांनी आदेश दिलेले नाहीत.
मा.कर्णे गुरूजी–आता त्यांच्या जाहिराती जुन्या रेटने चालू आहेत.
मा.अविनाश बागवे–यामध्ये दोन तीन कंपन्या आहेत. मंगेश इंटरप्रायझेस, सुप्रा कं.इ. आहेत.
मा.अध्यक्षा–या विषयाबाबतची माहिती द्यावी.
श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–मा.अध्यक्षा, हा जो विषय आहे त्यामध्ये आता सद्यस्थितीत स्टे आहे. याबाबत मागील सभेमध्ये चर्चा झाली होती आणि ते तिथे जाहिरात करतात ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. आपण या ठिकाणचे फोटाग्राफ्स काढून, हे माननीय कोर्टाच्या निदर्शनांस आणून देत आहोत.
मा.अविनाश बागवे–मा.दहीभाते साहेब, नुसते फोटो काढून निदर्शनांस आणणे हे कशासाठी, आपल्याकडे स्टाफ आहे, त्या जाहिरातील तिथे जाउन काढल्या पाहिजेत. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे, त्यांच्या कोर्ट ऑफ कंटेम्पंट दाखल केला पाहिजे.
मा.अध्यक्षा–तिथे स्टे असताना, त्यांनी तिथे जाहिराती करणे, हे बरोबर आहे का?
श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)– त्यांनी कारवाईला देखील बंदी घातली आहे, नुसता स्टे नव्हेतर, कुठलीही कारवाई करू नये, असे म्हंटलेले आहे.
मा.अविनाश बागवे–आपण कारवाई करू नये म्हणून बंदी घातली असेल पण स्टेस्को मेंटेन ठेवला पाहिजे.
श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–नक्कीच ठेवला पाहिजे.
मा.कर्णे गुरूजी– वस्तुस्थिती बदलू नये, मग जाहिरात का बदलते?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा विषय मान्य करावा.
श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–मा.अध्यक्षा, आपण फोटोग्राफ्स काढून न्यायालयाच्या हे निदर्शनांस आणून देत आहोत की, आपण जो स्टेस्को दिला आहे तो जैसे थे आहे आणि तो त्यांना देखील लागू आहे परंतु ते जाहिरात बदलत आहे, त्यामुळे आपण हे करावे.
मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, हा कोर्ट ऑफ कंटेम्पंट आहे आणि हे आम्ही दोन महिन्यांपूर्वी सांगितले होते परंतु त्यांनी असे सांगितले होते की, ते तसे नाही. परंतु ते आता त्याचे फोटोग्रॉफ्स काढत आहेत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ही लूट चालू आहे का? हे सगळे काय चालू आहे?
मा.सौ.मुक्ता टिळक–तुम्हाला कोर्टाने काही लेखी दिले आहे का? याबद्दल माहिती द्यावी.
श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–मा.अध्यक्षा, साहेब, मध्यतंरी कोर्टाचा जो संप होता आणि त्यानंतर फक्त तारखाच पडत गेल्या आहेत आणि आता दि.६ नोव्हेंबर किंवा ८ नोव्हेंबर, अशी या केस तारीख आहे असे मला वाटते. त्यावेळी आम्ही स्वत: विधी सल्लागार यांचेशी चर्चा करून आम्ही ते सादर करीत आहोत.
मा.सौ.मुक्ता टिळक–मा.अध्यक्षा,यामध्ये कोर्टाने काहीही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे हा विषय पुढे घेतला पाहिजे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–अहो, पण जिथे डोळ्यासमोर लूटालूट चालू असेल आणि मग कोर्टाच्या नावाखाली ही लूट चालू ठेवायची का?

मा.अविनाश बागवे–पण कोर्टाने जो स्टेस्को दिला आहे, तो आपण मेंटेन ठेवला पाहिजे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये स्टेस्को आहे आणि तुम्ही पुणेकरांची लूटालूट करीत आहात. हे कसे काय?

मा.सौ.मुक्ता टिळक–लुटालूट नाही, कोर्टाने आदेश दिलेले नाहीत.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–जर कोर्टाच्या नावावर असे होत असेल तर काहीतरी चुकत आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये काही आदेशच दिलेले नाहीत, त्यामुळे या विषयामध्ये आपण काहीच करू शकत नाही.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.अध्यक्षा, हा विषय मान्य करावा.

मा.सौ.मुक्ता टिळक–कोर्टाने आदेश दिले नसतील तर कसे काय?

मा.श्रीकांत जगताप–आपण यावर मतदान घेऊ शकतो का? याबाबतची माहिती द्यावी.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.अध्यक्षा, याबाबत आम्ही अशी एक उपसूचना देत आहोत की, येथील जाहिरात बदलू नये आणि मग त्यावर मतदान घ्यावे.

मा.अविनाश बागवे–बरोबर आहे, स्टेस्को आहे मग ते तसेच झाले पाहिजे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ही वस्तुस्थिती बदलू नये आणि मग ही वस्तुस्थिती बदलली असेल तर ते कोर्ट ऑफ कंटेम्पंट होत आहे.

मा.अविनाश बागवे–बरोबर आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– या विषयावर मतदान घ्यावे.

मा.श्रीकांत जगताप–या विषयाबाबत थोडी माहिती द्यावी.

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–मा.अध्यक्षा, कोर्टाने हाच निर्णय दिलेला आहे की, कुठलीही कारवाई करू नये आणि त्यावर स्टेस्को आहे, असे त्यांनी म्हंटलेले आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– या विषयावर मतदान घ्यावे.

मा.सौ.मुक्ता टिळक–कारवाई करू नये, याचा अर्थ काय? याबाबत माहिती द्यावी.

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–त्याच्यावर कुठलीही अनधिकृततेची कारवाई करू नये, असा त्याचा अर्थ होतो.

मा.सौ.मुक्ता टिळक–मा.अध्यक्षा, या विषयामध्ये अतिशय चुकीचे पध्दतीने विषय मान्य करण्याचे चालू आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– आम्ही चुकीचे करीत आहोत, असे कोण म्हणत आहे? आणि त्यांनी मला याबाबत कायदेशीरपणे आणि तांत्रिकदृष्टया समजून सांगावे. आम्ही चुकू शकत नाही, हे आम्हाला छातीठोकपणे माहिती आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–मा.अध्यक्षा,मुळामध्ये कोर्ट जर असे सांगत आहे की, कशावरही कारवाई करू नये तर जाहिरात काढण्याचा काहीच विषय येत नाही.

मा.अविनाश बागवे–माझी विनंती आहे की, आपण कारवाई करीत नाही. आपण जाहिरात फलक काढत नाही, यामध्ये स्टेस्को मेंटेन करावा, अशी आमची भूमिका आहे आणि तेच करावे आणि ते लोक ते करीत नसतील तर त्यांच्यावर कंटेम्पंट ऑफ कोर्ट तरी दाखल करावा.

मा.सौ.मुक्ता टिळक–हा कोर्ट ऑफ कंटेम्पंट होऊ शकतो का? याबद्दल माहिती द्यावी.

मा.सौ.अश्विनी कदम,अध्यक्षा(स्थायी समिती)–याठिकाणी प्रशासनाने जे विषयपत्र ठेवले आहे त्यामुळे कोर्ट ऑफ कंटेम्पंट होत आहे का?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– तो तसा झाला तर होऊ द्या, सगळया सभासदानी पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नवाढीसाठी उद्या काय, दोन दोन दिवस आत जावे लागले तरी जाता येईल.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–हा स्टेस्को वन साईड आहे की, बोथ साईड आहे? याबद्दल सांगा आणि बोथ साईड असेल तर आतापर्यंत ते कोर्ट ऑफ कंटेम्पंट का केले नाही?

मा.अविनाश बागवे–आमचे तेच मत आहे की, आपल्याला कारवाई करता येत नसेल तर त्यांनाही जाहिरात करता येणार नाही. ही जैसे थे स्थिती मेंटेन केली पाहिजे याबद्दल सांगावे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– मा.आयुक्त साहेब, या विषयामध्ये जे कोणी सुप्रा वैगेरे कंपन्या आहेत. त्यांच्याकडून सॉफ्टवेअर घ्यायचे होते आज त्याची परिस्थिती काय आहे? याबद्दल माहिती द्यावी.

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–मा.अध्यक्षा, पी.पी.पी.मध्ये जे सुप्राला दिले होते. त्यांनी जे सॉफ्टवेअर डेव्हलप करून द्यायचे होते ते त्यांनी केलेले सुध्दा आहे. परंतु ते काही तांत्रिक अडचणींमुळे ते सन २०१० ते २०१३ या सालामध्ये आपण नुतनीकरण दिलेले नाही. ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर स्कॅनिंग..

मा.अविनाश बागवे– ती तांत्रिक अडचण आम्हाला समजून सांगावी आणि ते कोणत्या वर्षामध्ये होती? ते सुध्दा सांगावे.

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–मा.चेअरमन साहेब, मी आपल्याला सांगितल्याप्रमाणे सन २०१० ते २०१३ त्यामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध आहेत. ती तांत्रिक अडचणीमुळे देऊ शकलो नाही, असे सांगितले आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते– मा.जगताप साहेब, यांनी या तांत्रिक अडचणीची माहिती द्यावी.

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–सन २०१० ते २०१३.

मा.अविनाश बागवे–तुम्ही तीन वर्षाचा कालावधी सांगत आहात. एक स्पेसिफिक टाईम सांगा. ही अडचणी कधी झाली?

दि.१/१०/१० ते दि.३१/१०/१३ या कालावधीत तांत्रिक अडचण होती.

मा.शंकर केमसे, सभागृहनेते–यामध्ये तांत्रिक अडचण कोणती होती? याबाबतची माहिती द्यावी.

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाश चिन्ह व परवाना)–माझ्याकडे चार्ज येताना मला जी कागदपत्रे उपलब्ध झाली त्यामध्ये तांत्रिक अडचणींमुळे देऊ शकलो नाही, असे दिले आहे.

मा.अविनाश बागवे–सर,आपण आकाशचिन्ह विभागाकडे कधीपासून रूजू झाला आहात?

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–सर, मी साधारणत: एप्रिल १४ पासून मी आहे.

मा.अविनाश बागवे–एप्रिल १४ ते आज ऑक्टोंबर १५ चालू आहे या कालावधी आपण त्या सॉफ्टवेअरचा कोणता उपयोग केला? याबद्दल माहिती द्यावी.

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाश चिन्ह व परवाना)–मी मा.स्थायी समितीला हेच सांगितले की, त्याचा आता स्कॅनिंगपुरताच पूर्ण होत आहे यामध्ये कागदपत्रे.

मा.अविनाश बागवे–हा साधा प्रश्न आहे.

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–स्कॅनिंगपुरता मर्यादीत आहे.

मा.अविनाश बागवे–फक्त स्कॅनिंग आणि त्यासाठी आपल्याला सॉफ्टवेअरची आवश्यकता काय आहे? आज कुठल्याही खात्यामध्ये होऊ शकते.

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–कुठल्याही खात्यामध्ये ते होऊ शकते.

मा.अविनाश बागवे–आता सगळे अधिकारी स्कॅनिंग करून मेल पाठवितात, व्हॉटस अपला पाठवितात, सगळीकडे पाठवितात. त्यासाठी तुम्हाला त्या सॉफ्टवेअरची आवश्यकता काय आहे? तुम्ही त्या सॉफ्टवेअरची एक प्रिंट तरी काढली आहे का?

श्री.दहीभाते,उपायुक्त(आकाशचिन्ह व परवाना)–यामधून स्कॅनिंग करून त्याच्या आधारे जे काही...

मा.अविनाश बागवे–साहेब, साधा प्रश्न आहे ते तुम्ही केले आहे का?

मा.अविनाश बागवे–मा.बकोरिया, अति.महा.आयुक्तसाहेब, आमचा मुद्दा हाच आहे. ते टेंडर कसे दिले? कोणाला दिले? ते ठीक आहे. Past is past परंतु आपण ज्या व्यक्तीला आपण एखाद्या गोष्टीसाठी मोबदला देत आहोत, ती गोष्ट तरी आपल्या उपयोगात आली पाहिजे आणि यामध्ये टाईम फ्रेम काय आहे? आता ऑक्टोंबर २०१५ चालू आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–पुणे महानगरपालिकेच्या फायद्यासाठी हा विषय मान्य करा आणि जर का कोणाचा विरोध असेल तर, मतदान घ्या अशी माझी नम्र विनंती आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–जर हे प्रकरण कोर्टामध्ये असेल तर यामध्ये पुणे महानगरपालिकेचा कोणता फायदा आहे? कोर्टाने स्टेस्को दिला आहे आणि यामध्ये कोर्टाने असे सांगितले आहे की, कोणतीही कारवाई करू नये.

मा.श्रीकांत जगताप–यामध्ये महानगरपालिकेचा फायदा काय आहे? याबद्दल सांगावे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.अध्यक्षा, यामध्ये असे आहे की, एखादा माणूस, पुणे महानगरपालिकेच्या प्रॉपर्टीवर स्टेस्को दिलेला असताना सुध्दा त्या स्टेस्कोचा अवमान करून तिथे आपला व्यवसाय कंटीन्यु ठेवत असेल आणि कोर्टाने सांगितले असेल की, महानगरपालिकेच्या प्रापर्टीवर स्टेस्को दिला आहे. महानगरपालिका कारवाई करीत नाही कारण यामुळे कोर्टाचा अवमान करायचा नाही आणि ती पार्टी जर का, कोर्टाचा अवमान करून त्यांचा धंदा करीत असेल तर ते महानगरपालिकेचे नुकसान नाही का?

मा.श्रीकांत जगताप–यामध्ये फायदा काय आहे?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हे नुकसान नाही का?

मा.अविनाश बागवे–यामुळे असा फायदा होईल की, ते फलक ताब्यात येतील.

मा.सौ.मुक्ता टिळक–प्रथम येणाऱ्यास प्राधान्य हे त्यापेक्षाही भयानक आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण ते सुध्दा पाहू, हा श्रीगणेशा तरी होऊ द्यावा. आमची विनंती आहे की, हा विषय मान्य करावा.

मा.सौ.मुक्ता टिळक–हा विषय मान्य करणेस आमचा विरोध आहे. या विषयावर मतदान घेता येईल का?

मा.अविनाश बागवे–आपण श्रावणधारा सारखा विषय कोर्टामध्ये असताना आपण मान्य केला आहे.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये जर एखादी कारवाई करायची असेल तर ती आमच्यावर करावी.

मा.अध्यक्षा–याबाबत विधी खात्याचे स्पष्ट मत काय आहे? ते सांगावे.

मा.रविंद्र थोरात, विधी अधिकारी–मा.चेअरमन मॅडम, हे २६/२/२०१५ चे पत्र आहे यामध्ये वकीलांनी असे कळविले आहे की, Parties are direct to maintain to statesco till filing of reply. हे वकीलांना कळवावे, असे कोर्टाने कळविले आहे. यानंतर रिप्लॉय फाईल केल्यानंतर असे दिसते की, सद्यस्थितीत कोर्टाची पोझिशन काय आहे?

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आपण मतदान कशावर घेत आहोत तर ते स्टेस्को मेंटेन केला जात नाही. कोर्टाचा अवमान केला जात आहे तो स्टेस्को मेंटेन केला गेला पाहिजे तो केला जात नाही म्हणून आपण मतदान घेत आहोत. आमची इच्छा अशी आहे की, तो स्टेस्को मेंटेन करावा. यामध्ये काय चुकते?

मा.सौ.मुक्ता टिळक–मुळामध्ये हा कोर्ट ऑफ कंटेम्पंट आहे का? याबद्दल माहिती द्यावी.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–कोर्टाचा अवमान करू नये, हे म्हणणे चुकीचे आहे का?

मा.राजेंद्र शिळीमकर–मा.सभागृहनेते, आज मा.मुख्यसभा आहे आणि उशीर होत आहे. आपण हा विषय पुढील सभेत घ्यावा.

मा.शंकर केमसे,सभागृहनेते–विधी खात्याने माहिती द्यावी.

मा.रविंद्र थोरात(विधी अधिकारी)–मा.अध्यक्षा महोदया, या पत्रावर statesco till filing of reply असे दिले आहे आणि आता रिप्लॉय दाखल झाला आहे. सद्यस्थितीतील पोझिशन काय आहे? ते पहावे लागेल.

मा.सौ.मुक्ता टिळक–मग तोपर्यंत हा विषय पुढे घ्यावा.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्ही आमचे मत मांडले आहे की, कोर्टाने स्टेस्को दिला आहे तो तुम्ही कंटीन्यु करा. आम्ही तो तोडण्याबद्दल सांगत आहोत का?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–महानगरपालिकेला स्टेस्को आहे आणि व्यवसाय करणाऱ्याला स्टेस्को नाही. हा कुठला न्याय आहे?
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्ही असे म्हणत आहोत की, हा स्टेस्को कंटीन्यु करावा.
मा.सौ.मुक्ता टिळक–तुम्ही हे कोर्टाला विचारावे. तुम्ही त्यांना काय विचारता, यामध्ये त्यांचा काय संबंध आहे?
मा.बापूराव कर्णे गुरूजी–कंटेम्पंट ऑफ कोर्ट होत होते तर, आपण काहीतरी करायला पाहिजे होते.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते– या विषयावर मतदान घ्यावे.
मा.नगरसचिव–विषय क्र.१३७६ मान्य करणेस विरोध असल्यामुळे मी यावर मतदान घेतो.
अनुकूल–१०
प्रतिकूल–०३
**निर्णय**–सदरचा विषय बहुमताने संमत करण्यात आला.
विषय क्र.१३७७
मा.अविनाश बागवे–आपण सदरचा विषय अमान्य करण्याबाबत ठरविले होते. यामध्ये प्रशासनाला आदेश दिले आहेत की, पुरस्काराची प्रक्रिया पूर्ण करावी आणि हे डॉकेट नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यामध्ये द्यावे.
मा.शंकर केमसे–हा विषय पुढील सभेत घ्यावा.
**निर्णय**–सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा.
**कार्यपत्रिकेवरील विषय**
विषय क्र.१३७८
मा.नगरसचिव–विषय क्र.१३७८ साठी उपसूचना आली आहे

**उपसूचना**

**सूचक**–मा.बापूराव कर्णे गुरूजी    **अनुमोदक**–मा.मुकारी आण्णा आलगुडे

प्रभाग क्र. ५ ब मधील कळस सर्व्हे क्र.१२० येथील प्राथमिक शाळेमध्ये उर्वरित विकास कामे करणे यासाठी र.रू.५० लाख, अंदाजपत्रक पान क्र.१९७ अ.क्र.१९०, शिवणे ते खराडी रस्ता करणे या कामामधील ५० लाख रू.कमी करून वरील काम पूर्ण करणे.
मा.अध्यक्षा–उपसूचनेसह विषय मान्य करावा.
मा.नगरसचिव– ज्यामधून पैसे कमी करावयाचे आहेत ते अर्थशिर्षक बदलले आहे. शिवणे ते खराडी रस्ता करणे या कामातून ५० लाख रू.कमी केले आहेत आणि बाकीचे ५० लाख रू.तसेच ठेवले आहेत.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते उपसूचनेसह मान्य करण्यात आला.
**विषय क्र.१३७९**
मा.अविनाश बागवे–यामध्ये अभिप्राय अमान्य करून, मूळ ठराव मान्य करावा.
मा.सौ.ओसवाल–यामध्ये निवेदनाची यादी नाही.
मा.नगरसचिव–मा.सदस्य, यांच्या मूळ प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही करावी.
मा.सौ.मुक्ता टिळक–मूळ प्रस्ताव काय आहे? याबद्दलची माहिती द्यावी.
मा.नगरसचिव–यामध्ये मूळ प्रस्ताव असा होता की, '' मा.अविनाश बागवे, मा.श्रीकांत जगताप, मा.मुकारी आलगुडे आणि मा.राहूल तुपेरे, पुणे महापालिका हद्दीत चालू असलेल्या बांधकाम प्रकल्प परवानगी व इतर मान्यता प्रकरणांमध्ये विना भोगवटा जागा वापर ''
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मा.नगरसचिव, या प्रस्तावातील सर्वात शेवटची ओळ वाचावी.
मा.नगरसचिव–''करण्यात येणारी दंड आकारणी प्रकरणांमध्ये, र.रू.२५ लाख व त्या पुढील प्रकरणांची मान्यता घेणेकरीता मा.स्थायी समितीची मान्यता घेणे अत्यावश्यक करण्यात यावे.''
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–मान्यता घेण्याकरीता, मा.स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक करण्यात यावे म्हणजेच माहिती दिली गेली पाहिजे. मान्यता म्हंटल्यास त्या सर्वांना इथे येऊन बसावे लागेल. त्यामुळे यातील हा शब्द बदलावा.
मा.अविनाश बागवे–मान्यता घेण्यात यावी.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–माहिती देण्यात यावी. त्यांना जे काही करायचे असेल तर मा.स्थायी समितीला माहिती देण्यात यावी, असे नमूद करावे. निदर्शनांस आणण्यात यावे, मान्यता घेण्यात यावी असे नमूद करू नये.
मा.अविनाश बागवे–ठीक आहे.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–यामध्ये, मान्यतेच्या ऐवजी माहिती असा बदल करावा.
**निर्णय**–मा.सदस्यांच्या मूळ प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही करावी आणि र.रू.२५ लाखांच्या वरील प्रकरणांची माहिती मा.स्थायी समितीस देण्यात यावी.

विषय क्र.१३८०

मा.अविनाश बागवे–मा.अति.महा.आयुक्त, बकोरिया साहेब, आपण जो अहवाल दिला आहे, यामध्ये आमचे असे ठाम मत आहे की, आपण हा अर्धवट अहवाल दिला आहे. आपण आपल्या अहवालामध्ये असे लिहले आहे की, मा.स्थायी समितीमध्ये जी चर्चा झाली आहे. दि.१६ जुलै २०१५ च्या समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार आपणास चौकशी करण्यास सांगितले होते आणि नंतर आपण त्रिसदस्य समिती नेमली. परंतु तुम्ही हे सगळे सादर करीत असताना मूळ जी चर्चा झाली आणि जे मूळ विषय होते त्या विषयी तर काही सांगितलेले नाही. त्याचा तुमच्या अहवालामध्ये सुध्दा उल्लेख नाही आणि कारवाई संदर्भात सुध्दा काही उल्लेख नाही. मूळ चर्चा अशी झाली होती की, जाहिरात फलकांच्या नुतनीकरणाच्या संदर्भात, मा.महा.आयुक्त यांचा जो प्रस्ताव होता, मा.महा.आयुक्त यांचे जे आदेश होते की, साईड मार्जिन, फ्रंट मार्जिन या विषयी चर्चा झाली होती. याबद्दल तुमच्या अहवालामध्ये काहीही उल्लेख नाही. दुसरी गोष्ट अशी की, या गॅन्ट्रींच्या संदर्भात आम्ही जो विषय उपस्थित केला होता की, जो प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य. हे करण्याची योजना काय आहे? आणि हे कोणाच्या अधिकारात झाले? याबद्दल सुध्दा काही दिलेले नाही. तुम्ही त्यामध्ये फक्त असे सांगितले आहे की, हो हे केले आहे, हे निदर्शनांस येत आहे आणि पालन न केल्याचे जसे दाखवित आहात परंतु हे कोणी केले? याला जबाबदार कोण आहेत? याबद्दल काही सांगितलेले नाही. तसेच राजदीप यांचे जे दिशादर्शक कमानी असतील किंवा जे फलक असतील त्याची तुमच्या अहवालामध्ये जी संख्या आहे. तुम्ही जवळजवळ ती ११०० किंवा १०५० इतकी निश्चित केली आहे. परंतु ते सध्या ताब्यात घेताना, ते किती सुस्थितीत आहे ? याबाबत देखील आकाशचिन्ह परवाना विभाग किंवा कोणाकडूनही काही घेतलेले नाही. आमचा जो मूळ विषय होता की, नोव्हेंबर २०१४ ते एप्रिल २०१५ या ६ महिन्यामध्ये ज्या जाहिराती लावल्या आणि त्यामुळे महानगरपालिकेचे जे उत्पन्न बुडाले आहे. त्यामध्ये भुईभाडे आणि परवाना फी आहे. त्याबद्दल सुध्दा एक शब्दाचाही उल्लेख नाही. हे कोण वसूल करणार? यास जबाबदार कोण आहेत? त्याबद्दल काहीच सांगितले नाही. तुम्ही उल्लेख केला आहे की, राजदीपच्या मूळ प्रस्तावाला मा.मुख्यसभेने मान्यता दिली, मा.स्थायी समितीने मान्यता दिली. करार झाला परंतु दुसरा जो फेरप्रस्ताव मान्य झाला त्यासाठी मा.मुख्यसभेची मान्यता नाही, त्याचा करार केलेला नाही. ती जबाबदारी कोणाची आहे? इतकी ८ ते ७ वर्षे जाहिराती वापरल्या इतके महानगरपालिकेचे कारण शेवटी ती महानगरपालिकेची प्रॉपर्टी झाली. पहिले जे टेंडर मान्य झाल्यानंतर, आपला करार संपल्यानंतर, ती प्रॉपर्टी महानगरपालिकेची झाली मग त्यांनी ७ ते ८ वर्षे महानगरपालिकेची प्रॉपर्टी वापरली आहे. मग त्याचे भुईभाडे कुठे आहे? त्या संदर्भात कोणी अधिकार दिले? त्या संदर्भातील करार कोणी केला नाही? साहेब, याबद्दल आपण काहीच लिहलेले नाही आणि वास्तविक पाहता एखाद्या जाहिरात संस्थेला किंवा एखाद्या कंपनीला आपण जर ११ ते १२ वर्षे टेंडर दिलेले असेल किंवा तो त्या ठिकाणी ती गोष्ट वापरत असेल तर प्रशासनाचे विशेषत: वाहतूक नियोजन विभागाची त्या ठिकाणी जबाबदारी होती की, किमान सहा महिने किंवा वर्षभरापूर्वी देणे आवश्यक होते पण किमान सहा महिन्यापूर्वी सगळया डिटेल्सहित त्यांनी प्रशासनाकडे पाठवावे पाहिजे होते. तुमच्या अहवालामध्ये असे लिहले की, दि.२४ नोव्हेंबर रोजी त्याचा करार संपला आणि दि.२७ नोव्हेंबर किंवा दि.२८ नोव्हेंबर रोजी वाहतूक नियोजन विभागाकडून आकाश चिन्ह विभागाकडे सगळी कागदपत्रांसह सगळे देण्यात आले. हे काय आहे? त्यांना जर हे माहिती आहे की, दि.१४ रोजी हा करार संपत आहे आणि तिथे इतक्या मोठ्या प्रमाणात जाहिराती उभ्या आहेत आणि महानगरपालिकेचे उत्पन्न बुडू नये म्हणून त्यांनी ही कार्यवाही सहा महिने आधी का केली नाही? याला नक्की जबाबदार कोण आहे? आपण कोणतीच जबाबदारी निश्चित केली नाही. फक्त सगळे मोघम सांगितले, सगळे दिले आहे परंतु यावर काहीच सांगितले नाही. त्यामुळे आमची विनंती आहे की, हा तुमचा अहवाल अर्धवट आहे या गोष्टी विषयी तुम्ही पूर्ण माहिती घेऊन हा अहवाल पुन्हा सादर करावा. मा.अध्यक्षा, त्याठिकाणी महानगरपालिकेचे कोट्यावधी रूपयांचे उत्पन्न बुडाले आहे. आम्ही जो हिशोब काढला होता आणि यांनी जे फर्स्ट कम या बेसिसवर दिले आहेत असे असताना यांनी जे ४ महिन्यांचे, ६ महिन्याचे जे पैसे घेतले आहेत आणि त्यांच्याच आकडेवारी नुसार हिशोब केला असता जवळजवळ २ कोटी ४२ लाखाचे आपले सहा महिन्याचे उत्पन्न बुडले आहे आणि असे असताना, हे जवळजवळ अडीच कोटी रूपये बुडाले आहेत. हे इतक्या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, याला जबाबदार कोण आहे? आपण त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात? याबद्दल तर काहीच सांगितलेले नाही आणि हे फर्स्ट कम, फर्स्ट हे कोणी सांगितले. केकोणाचे आदेश होते? नुतनीकरणाच्या संदर्भात मा.महा.आयुक्त यांनी असे सांगितले की, आपण हे व्हेन्टींलेशन इ.सगळे तपासून बघा आणि त्यांना कुठल्याही संदर्भात तुमच्या साईड मार्जिनमधील ड्राईव्ह वेसाठी कुठलीही तडजोड न करता, असे त्यांचे आदेश होते. मग त्या आदेशाचे पालन कोणत्या अधिकाऱ्याने केले नाही किंवा या चुकीच्या गोष्टी कोणाच्या दबावाखाली केल्या आहेत? याबद्दल तर काहीच सांगितले नाही. मा.अति.आयुक्त, बकोरिया साहेब, या संदर्भात आपण आम्हाला सविस्तर माहिती द्यावी. कारण हा विषय गंभीर आहे आम्ही या विषया संदर्भात वारंवार बोलत आहोत. परंतु याबद्दल नुसते काहीतरी अहवाल द्यायचा म्हणून दिला आहे. आम्ही ज्या गोष्टी सांगितल्या आहेत. आम्ही त्या आकडेवारी सहित सांगितल्या आहेत. त्याबद्दल देखील काहीच दिलेले नाही.

मा.अध्यक्षा–आपण मागील वेळेस सुध्दा असे सांगितले होते की, कोणतेही महत्वपूर्ण निर्णय घ्यायचे असतील तर ते मा.स्थायी समिती समोर आणावेत परंतु ते आणले गेले नाहीत आणि ही बाब सभासद आपल्या निदर्शनांस आणून देतात त्यामुळे आपण याठिकाणी जबाबदारीपूर्ण उत्तर द्यावे, असे अपेक्षित आहे.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, आपणास माहिती आहे की, प्रशासनाला ज्या विषयाबाबत गांभीर्य वाटते त्याबाबत ते कठोर कारवाई करतात. ते व्हिजीटला गेले आणि तेथे जर अधिकारी सापडला नाही तर त्याला सस्पेंड केले जाते, ताबडतोब निलंबित केले जाते. इथे या ठिकाणी आपले कोट्यावधीचे नुकसान झाले आहे. हा प्रशासनाचा हलगर्जीपणा आहे. ते एकमेकांवर बोटे दाखवित आहेत की, आम्ही त्यांच्याकडे दिले होते परंतु त्यांनी टेंडर काढले नाही आणि त्यांच्यावर काहीच कारवाई होत नाही. त्यांना मोघम सोडणार का? त्यावेळी जर मा.महा.आयुक्त यांनी असे सांगितले होते की आणि हे त्यांनी अहवालामध्ये दिले आहे

की, डिसेंबर २०१४ मध्ये ७ दिवसांचे आत टेंडर काढावे, असे लिहले होते. वाहतूक विभागाने सगळी माहिती दिली की, या कमानीचे गॅन्ट्रीजचे स्पेसिफिकेशन काय आहे? त्याचा साईज काय होता मग ७ दिवसांमध्ये हे टेंडर का लागू शकले नाहीत? तुम्हाला मे महिन्यापर्यंत थांबण्याची गरज काय होती? त्यामध्ये काही वेगळे ॲडीशनल करून शौचालये इ.टाकण्याची गरज काय होती? तुमच्याकडे सगळे रितसर स्पेसिफिकेशन आहे. सगळी माहिती होती मग परवाना फी चे टेंडर का लावले नाही? तुम्ही जे चार झोनचे ठरविले होते ते करायचे होते. आपले त्याप्रमाणात उत्पन्न वाढले असते. ही गोष्ट मुद्दामहून केली आहे आणि ही गोष्ट महानगरपालिकेच्या हिताची नाही म्हणून आमची विनंती आहे की, तुम्ही यावर व्यवस्थित स्पष्टीकरण द्यावे आणि यामध्ये जबाबदारी निश्चित करावी. तुम्ही अहवाल दिल्यानंतर, मा.महा.आयुक्त साहेब काय म्हणाले होते, आम्ही विचारणा केली होती की, तुम्ही मा.स्थायी समितीमध्ये अहवाल का दिला नाही यावर त्यांनी यामध्ये मला जबाबदारी निश्चित करू द्या, असे सांगितले होते. आम्ही अहवाल दिल्यानंतर यामध्ये दोषी कोण आहे, ते नंतर सांगतो. परंतु याबाबत यामध्ये काही सांगितले आहे का? तर यामध्ये काहीच सांगितलेले नाही. आम्हाला जे डॉकेट, अहवाल दिले आहेत त्यामध्ये ते काहीच सांगितलेले नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक–तुम्ही दिलेल्या अहवाल मध्ये असे दिले आहे की, जुलै २०१४ मध्ये जी बैठक झाली त्यामध्ये मनपा कर यामध्ये सवलत, भुईभाडे नाही. हे कोणी ठरविले?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–फर्स्ट कम, फर्स्ट, हे कोणी ठरविले?

मा.अविनाश बागवे–हा अधिकार कोणी दिला?

मा.सौ.मुक्ता टिळक–हा अधिकार कोणी दिला? हे मा.स्थायी समितीच्या निदर्शनांस आणले आहे, असे कुठेही दिसत नाही. मा.मुख्यसभेच्या निदर्शनांस आणलेले कुठेही दिसत नाही.

मा.अविनाश बागवे–त्यांनी हे निदर्शनांस आणले नाही आणि आपण हे मुद्दे उपस्थित केले म्हणून तर हे मुद्दे चर्चेत आले. त्याबद्दल प्रशासनाने काहीच दिले नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये प्रीबीड मिटींगच्या वृत्तांतावर क्रमांक, दिनांक, स्वाक्षरी दिसून येत नाही. ही चूक कोणाची आहे? दुसरी बाब अशी की, यामध्ये असे म्हंटले आहे की,१७/१/२०१४ ने ४ कोटी ८२ लाख २९/१०/१४ ने ५ कोटी ४९ लाख हे शुल्क आठ दिवसांच्या आत भरणेबाबत नोटीस देण्यात आली. प्रत्यक्ष शुल्क भरले की नाही? हे या अहवालामध्ये कुठेही दिसत नाही म्हणजे जवळजवळ ९ ते १० कोटी रू.चे शुल्क संबंधित संस्थेने भरले की नाही? आणि मग याची जबाबदारी कोणावर आहे?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आदेशाची अंमलबजावणी झाली की नाही? हे यामध्ये स्पष्ट होत नाही.

मा.अविनाश बागवे– या अहवालामध्ये असे लिहले आहे की, विभागाच्या नोटीस बोर्डवर जाहिरात लावली होती आणि ते ४५ जाहिरातदारांनी ती पाहिल्याचे स्वाक्षऱ्या केल्या आहेत. मग हे ४५ जाहिरातदार किंवा त्या कंपन्यांच्या जे कोणी होते त्यांनी फक्त ही जाहिरात बघितली यासाठी आपल्याकडे कोणीच अप्लॉय केले नाही? जे लोक इतके वर्षानुवर्षे महानगरपालिकेच्या जाहिरातीचा व्यवसाय करतात आणि अशा लोकांनी फक्त स्वाक्षऱ्या दिल्या की, आम्ही नोटीस बोर्डवर जाहिरात पाहिली परंतु कोणीच अप्लॉय केले नाही आणि त्यावेळी जर कोणी अप्लॉय केले असेल तर ते लोक किती होते? आणि तुम्ही ते किती लोकांना दिले? याबाबतही माहिती द्यावी.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये दुसरी एक महत्वाची बाब अशी की, ७ दिवसाच्या आत प्रक्रिया राबविणे आवश्यक होते. ते मागील बैठकीमध्ये विषय झाला की, लष्कर पाणी पुरवठ्याच्या बाबतीत मा.अति.आयुक्त राजेंद्र जगताप साहेब जेव्हा अशाच पध्दतीने आदेश देतात. त्या आदेशाकडे संपूर्ण दुर्लक्ष होते. कनिष्ठ स्तरावरील अधिकारी संपूर्ण दुर्लक्ष करतात. टेंडर रिकॉलसाठी ७ दिवसांच्या आत द्यायचे असताना सुध्दा तेथे दोन महिन्यांने दिले आहे आणि इथे मात्र तुम्ही हा जो ठपका ठेवत आहात, तो कोणत्या आधारावर आहे? म्हणजे प्रत्येक खात्यासाठी तुमचा न्याय वेगळा आहे का? आणखी एक बाब आम्हाला आजतागायत समजले नाही की, प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य, हे धोरण मनपाच्या मुख्यसभेने ठरविले आहे का? हे कोणाच्या सांगण्यावरून ठरविले?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–मा.अध्यक्षा, मा.आयुक्त साहेबांनी तीन सदस्यांची समिती स्थापन केली होती त्यामध्ये गॅन्ट्रीबाबत जे अहवाल आले होते ते आम्ही ३ सदस्यांनी पाहिले आहेत. हे सन २००० पासून आहे आणि स्टेप बाय स्टेप त्यामध्ये जी अनियमितता आली आहे. आपण प्रीबिड मिटींगबाबत सांगितले होते की, त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा नंबर आणि स्वाक्षरी नाही.परंतु हे आपण यासाठी निदर्शनांस आणले आहे की,त्याठिकाणी हे अशा प्रकारचे झालेले आहे आणि त्या आधारावर ही पूर्ण प्रोसेस झालेली आहे.

मा.अध्यक्षा–ही चौकशी आपल्या अध्यक्षतेखाली करण्यात आली का?

मा.अविनाश बागवे– त्यावेळी मा.बकोरिया साहेब बाहेरगावी होते आणि त्यावेळी मा.महा.आयुक्त साहेबांनी असे सांगितले होते की, आम्ही आमच्या अध्यक्षतेखाली ३ सदस्यांची चौकशी समिती नेमून याची चौकशी करीत आहोत.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–सन २००० मध्ये जेव्हा ही प्रीबिड मिटींग झाली होती त्यामध्ये कुठल्याही प्रकारची करसवलत आणि भुईभाडे नाही, अशा प्रकारचे द्यायचे नाही ते प्रीबिड मिटींगमध्ये आलेले आहे आणि प्रीबिड मिटींगच्या वृत्तांतावर कोणाचीही साईन नाही.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ॲथाराईज्ड नाही, फक्त चर्चा आहे.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)– चर्चा झालेली आहे आणि त्याच्या आधारावर दिले गेले आहे. इनिशिअली सेव्हनटी फाईव्ह, टेव्न्टी फाईव्ह असे..

मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यावर कोणाचीही स्वाक्षरी नाही का?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–सन २००० मध्ये त्यावर कोणाचीही स्वाक्षरी नाही.

मा.अविनाश बागवे– म्हणजेच हे मान्यता न घेता केलेले आहे. ते अधिकृत मान्यता न घेता केलेले कृत्य आहे.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–प्रीबिड मिटींगमध्ये हा विषय आलेला आहे पण ह्यामध्ये प्रोसिंडींग मध्ये कुठल्याही प्रकारची साईन नाही. पण त्यानंतरची जी प्रोसेस आहे की, मा.स्थायी समिती आणि मा.मुख्यसभेमध्ये प्रशासनाचा जो ठराव झाला आहे. तो व्यवस्थित आहे.

मा.अविनाश बागवे– पहिला मूळचा.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–पहिल्या प्रीबिड मिटींगच्या वृत्तांतावर साईन नाही.

मा.अविनाश बागवे– त्यानंतर काय झाले?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–त्यानंतर हा विषय मा.स्थायी समितीमध्ये आला आणि सन २००० मध्ये मा.स्थायी समितीमध्ये, ७५:२५ हा जो रेशो होता आणि त्याप्रकारे करावयाचे होते. ते मा.स्थायी समितीने मान्य केले आणि त्यानंतर तो विषय मा.मुख्यसभेत पाठविण्यात आला आणि तो विषय मा.मुख्यसभेनेही मान्य केला आणि त्यानंतर पुन्हा मा.महा.आयुक्त साहेब यांच्याकडे एक मिटींग झाली आणि त्यावेळी हे ५०:५० च्या रेशामध्ये आलेले आहे आणि हे जे जाहिरातीचे शुल्क होते आणि आर.पी.बी.एल.क्लासिकल इन्फ्रास्ट्रक्चर यांना हे काम दिले गेले होते आणि यासाठी जो करार झाला होता तो ७ वर्षे ४ महिन्यांसाठी होता.

मा.अविनाश बागवे– तुम्ही अहवालामध्ये असे दिले आहे की, दुसऱ्यांदा जो विषय झाला त्यामध्ये मा.स्थायी समितीची मान्यता आहे आणि त्यास मा.मुख्यसभेने मान्यता दिलेली नाही आणि त्याचा करार झालेला नाही.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–त्यामध्ये मा.मुख्यसभेची मान्यता नाही. हे मा.मुख्यसभेकडे जायला पाहिजे होते.

मा.अविनाश बागवे– यामध्ये त्यांच्यासोबत करार का केला नाही?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–त्यावेळी झालेला नाही.

मा.अविनाश बागवे– हो मग, हा करार का केला नाही?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–तेच आमच्या रिपोर्ट मध्ये आलेले आहे.

मा.अविनाश बागवे– ही जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्याची होती?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

मा.अविनाश बागवे– प्रशासन म्हणजे कोण?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–त्यावेळी हे सर्व कमिशनर साहेबांच्यावतीने झालेले आहे.

मा.अविनाश बागवे– मा.कमिशनरसाहेब, करार करीत नाही.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–करार नाही परंतु बाकीच्या प्रोसेस झाल्या आहेत.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–सगळया प्रोसेस झाल्या. मा.मुख्यसभेची मान्यता नाही, संबंधितांसह करारनामा केलेला नाही. पण जाहिराती झालेल्या आहेत.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–होय, ते झालेले आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते कोणाच्या अधिकारात झाले?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–मा.मुख्यसभेमध्ये, मा.कमिशनर सरांचे डॉकेट होते.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–जी.बी.चे डॉकेट.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)– हे ७५ :२५ रेशोमध्ये होते ते मान्य होते पण नंतर चेंज झालेले आहे. मा.स्थायी समितीमध्ये तो विषय आला होता आणि ५०:५० मध्ये ही जाहिरात करायची होती असे हे आले होते.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–पण ते मान्य न होता पुन्हा जाहिरात झाली कशी काय?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)– ती झालेली नाही.

मा.अविनाश बागवे–सर, आमचा मुद्दा तोच आहे की, मा.स्थायी समितीची मान्यता झाली परंतु मा.मुख्यसभेची मान्यता घेणे आवश्यक होते.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)– मा.अध्यक्षा, ते आवश्यक होते.

मा.अविनाश बागवे–ती घेतलेली नाही आणि मुळात यासाठी करार केला नाही की, कराराचे उल्लघंन काय होत आहे? तुम्ही पैसे आणि सवलतीबद्दल जे सांगितले आहे त्याबद्दल सुध्दा आहे. कारण शेवटी जो मूळ प्रस्ताव झाला होता. त्यामध्ये त्यांना कोणतीही फी भरायची नव्हती. फेरप्रस्तावामुळे त्यांना ते भरावे लागले असते. सर, हा करारच केलेला नाही. मग तो का केला नाही? ते अधिकार कोणाचे आहेत? ते अधिकार कोणी दिले? जर मा.स्थायी समितीने प्रस्तावास मान्यता दिली असेल तर ती करार करण्यासाठी दिली असणार. मग तो करार का केला नाही म्हणजे त्या ठिकाणी मुद्दामहून विस्कळीतपणा ठेवायचा. कुठेतरी लूपहोल ठेवायचे, यामध्ये जो कोणी संबंधीत अधिकारी असेल त्यांची यामध्ये हीच भूमिका आहे.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–प्रक्रिया पूर्ण न होताच हे सगळे..

मा.सौ.मुक्ता टिळक–म्हणजे ही टोटल प्रोसेसच ईलिगल आहे, असे समजायचे का? ज्या अर्थी हा विषय मा.स्थायी समितीकडे येतो. मा.स्थायी समिती तो विषय मान्य करते. हा विषय मा.स्थायी समितीकडून मा.मुख्यसभेकडे येत नाही, करारनामा होत नाही. मग आता कोणता करारनामा ग्राह्य धरायचा? तो सन २००० मधील करारनामा ग्राह्य धरावा की, सन २००१ मधील करारनामा ग्राह्य धरावा?

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आज कोणत्या करारनाम्याची अंमलबजावणी होत आहे?

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)– ५०:५० पर्सेन्ट मध्ये जो आलेला आहे तो फायनल मान्य झालेला आहे.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–कसे?
मा.अविनाश बागवे–त्याला जी.बी.ची मान्यता कुठे आहे?
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–त्यास मा.मुख्यसभेची मान्यता नाही.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–त्यामध्ये जनरल बॉडीची मान्यता नाही, करारनामाही झालेला नाही. मग त्याची अंमलबजावणी कशी होते? पहिल्यांदा विषय मा.स्थायी समिती मध्ये झाला मा.मुख्यसभेमध्ये झाला आणि मग त्या कराराप्रमाणे अंमलबजावणी व्हायला पाहिजे होती. ती झाली नाही. जी प्रक्रियाच अपुरी राहिली त्याची अमंलबजावणी आपण कशी काय करू शकतो?
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–मी त्याबद्दलच सांगतो की, सन २००० मध्ये जे झाले होते की, ७५ : २५ जे करायचे होते त्याऐवजी सन २००० मध्ये ५० : ५० केले गेले.
मा.सौ.मुक्ता टिळक, मा.बापूराव कर्णे गुरूजी–ते आमच्या लक्षात आले.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–परंतु त्यामध्ये मा.मुख्यसभेची मान्यता नाही.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्यास मा.मुख्यसभेची मान्यता नाही आणि त्यामध्ये करारनामा सुध्दा नाही.
मा.बापूराव कर्णे गुरूजी–मा.मुख्यसभेची मान्यता झाल्याशिवाय करारनामा होऊ शकत नाही आणि जर त्याची अंमलबजावणी केली असेल तर त्याची दुरूस्ती करावी लागेल आणि संबंधित संस्थेकडून पहिल्या करारानाम्याप्रमाणे वसूली करावी लागेल.
मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये आणखी एक महत्वाचा मुद्दा मा.अविनाश बागवे यांनी मांडला आहे की, त्याचा कन्सेशन पिरीएड ५/१०/२००१४ पर्यंत दिलेला होता आणि जर दि.५/१०/१४ मध्ये जर एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे जातो. तो किमान सहा महिने आधी तरी जायला हवा होता.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–मा.कमिशनर सरांच्या नोटींग मध्ये सुध्दा आले आहे की, ७ दिवसांच्या आत प्रोसेस करावी.
मा.सौ.मुक्ता टिळक–ते नोटींग कधी आले?
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–ते नोव्हेंबर महिन्यामध्ये आले होते.
मा.सौ.मुक्ता टिळक–मी दि.५/६/२०१४ च्या आधीच्या बाबतीत बोलत आहे.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–होय, ५ ऑक्टोंबर पर्यंत त्यांना वाढवून दिले आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्यांना वाढवून दिले आहे परंतु मुळात जर आपल्याला खरोखरच महानगरपालिकेचे उत्पन्न वाढवायचे होते. तो करार ५.१० मध्ये संपला तो करार नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यामध्ये दुसऱ्या विभागाकडे जातो त्या दरम्यान महिनाभराच्या काळात काय झाले? ते कोणाकडे होते?
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–त्यामध्ये असे झाले होते की, त्यांनी मागणी केली होती की त्या पिरीएड मध्ये दुर्वस्था झाली. त्याप्रमाणे त्यांना किती दिवसांचे कन्सेशन द्यावे, यासाठी खात्याने हिशोब केला होता. त्याप्रमाणे त्यांना दिले गेले.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्याचा शेवटचा करार दि.२५/११ रोजी संपला आणि दि.२८/११ ला एका डिपार्टमेंटकडून दुसऱ्या डिपार्टमेंटकडे गेले. तीन दिवसांमध्ये दुसऱ्या डिपार्टमेंटने टेंडर काढणे अपेक्षित आहे का?
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–नाही, याबाबत संबंधीत डिपार्टमेंटने अगोदर कळविले होते की, अशा प्रकारची यांची मुदत संपत आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–कधी कळविले होते?
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–पूर्वीचे आहे. अगोदर हा चार्ज श्री.बोनाला यांचेकडे होता.
मा.सौ.मुक्ता टिळक–ते तुमच्या डिपार्टमेंटने कधी कळविले होते? याबाबत माहिती द्यावी.
मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त(इ)–त्याची नक्की तारीख माझ्याकडे उपलब्ध नाही.
मा.अविनाश बागवे–तुमच्या रिपोर्टमध्ये तसे लिहलेले नाही.
श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–आता जो मुद्दा उपस्थित झाला आहे, त्यावर मी खुलासा देतो की, पहिला इश्यू झाला तो प्रीबिड मिटींगचा होता. प्रीबिड मिटींगच्या कव्हरिंग लेटरवर, प्रत्यक्षात तत्कालीन अति.महा.आयुक्त, कॅप्टन देशपांडे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली प्राबिड मिटींग झाली होती. त्या प्रीबिड मिटींगमध्ये सविस्तर चर्चा झाली होती त्या चर्चेमध्ये जे काही मुद्दे उपस्थित झाले ते सगळे, टेंडर जो काही कॉन्ट्रक्टर पार्टीसिपेट झाले होते त्या सगळयांना सर्क्युलेट केले आहे. त्या सगळयांचे टेंडर डॉक्युमेंटस अजूनही आपल्याकडे बायडिंग करून रेडी आहेत. ट्रान्सफरसीं सगळयांना इक्वली केलेली आहे आणि मा.मुख्यसभेची मान्यता घेतलेली आहे.
मा.सौ.मुक्ता टिळक–त्यावर स्वाक्षरी नाही.
श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–कव्हरींग लेटरवर सही आहे. सोबत जोडलेल्या इनक्लोजरवर आहे पण स्कॅन केलेल्या तारीखवाईज, ही मिटींग कधी झाली? हे सगळे त्यामध्ये आहे. तसेच दुसरा एक महत्वाचा मुद्दा आपण असा मांडला होता की, ११५० बोर्ड. आपल्याकडे त्यावेळी ११५० बोर्ड बसविलेले आहेत. त्यांच्या सर्व ठिकाणांसह आपल्याकडे यादी आहे. त्यामध्ये ६००, म्हणजे नो–पार्किंग, वन–वे, अशा प्रकारचे बोर्डस सुध्दा आहेत, नावाच्या पाट्या आहेत. लोकशन बोर्ड आहे उदा.शनिवार वाड्याकडे जाणे आणि ते हिरव्या रंगाचे बोर्ड आहेत. महानगरपालिकेमार्फत शहरामध्ये वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया प्रकारचे बोर्ड बसविलेले आहेत पण त्या एजन्सीचे बसविलेले ६०० हिरव्या रंगाचे बोर्ड अजून बऱ्याच ठिकाणी आपल्याला दिसत आहेत.

मा.अविनाश बागवे–हे जे बरेच आहे, तोच आमचा मुद्दा आहे. आपल्याला जे ताब्यात घ्यायचे होते त्याबाबत तुम्ही किंवा आकाशचिन्ह विभागाने ते सुस्थितीत असल्याचे व्हेरीफाय करून घेतले होते का?

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–आकाशचिन्ह विभागाने मागील दोन वर्षामध्ये जे साईन बोर्ड बसविले आहेत, त्यामध्ये पार्किंग, नो–पार्किंगचा बोर्ड. मागील दोन तीन वर्षामध्ये आपण खूप मोठया प्रमाणामध्ये रस्तारूंदी केली आहे. पण हे बोर्ड ताब्यात घेत असताना आकाश चिन्ह विभाग किंवा ट्राफिक डिपार्टमेंटने ११५० बोर्डांची तपासणी केली नाही.

मा.अविनाश बागवे–तुम्ही ती तपासणी केली नाही.

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–आम्ही ते चेक केले नाही.

मा.सौ.मुक्ता टिळक–त्यांच्यासह १३ वर्षे करार असताना, एकदाही हे चेक केले नाही.

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–मध्यंतरी एक १३५० बोर्डचे, सन २००४ किंवा सन २००५ मध्ये सर्व्हे केला होता त्यावेळेला काही बोर्ड होते पण नंतर नो–पार्किंग.

मा.अविनाश बागवे–त्यांनी, जेव्हा मूळ करार झाला आणि त्यांना जेव्हा एक्स्टेंशन दिले त्यानंतर तपासणी केली नाही. परंतु त्यांनी आधी जी तपासणी केली होती ती सुध्दा काही काही ठिकाणची आहे परंतु हे सगळे पूर्ण नाही.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–यामध्ये एकूण बोर्ड ११५० होते.

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–यामध्ये नो–पार्किंग बोर्ड,पार्किंग बोर्ड, पुढे पेट्रोल पंप आहे, चौकांच्या नावाच्या पाट्या, असे बोर्ड आपण बसवून घेतले आहेत त्यावेळी इव्हन इंडियन एक्सप्रेस मध्ये संपूर्ण पानभर छापून आले होते. पण आता सध्याची स्थितीमध्ये ते तपासणी करून चेक करून घ्यावे लागेल.

मा.सौ.मुक्ता टिळक–मी ते विचारतच नाही. मला असे विचारायचे आहे की, ज्यावेळी हा कन्सेशन पिरिऐड वाढविला त्यासाठी त्यांची मोजणी कधी केली होती?

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–कन्सेशन पिरीएड वाढविण्यापूर्वी बोर्डांची मोजणी करून घेतली होती आणि मॅडम या छोट्या बोर्डवर जाहिराती नसतात. त्या आपल्या मार्गदर्शनासाठी असतात. यावर कोणीही जाहिराती लावू शकत नाही.

मा.अविनाश बागवे–त्यावर जाहिराती लावोत किंवा लावू नयेत परंतु आज ती महानगरपालिकेची मालमत्ता आहे, ती पूर्ण आहे का? असा तो मुद्दा आहे.

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–त्यांनी ज्या जाहिराती लावल्या होत्या त्यामध्ये नुकसान झाले आहे, असे ठेकेदाराने उत्तर दिले आहे आणि तिसरा मुद्दा, आपण जी वाढवून दिली. आपण पहिल्यांदा मा.स्थायी समिती व मा.मुख्यसभेची मान्यता घेतली होती. नंतर ज्यावेळेला ५०: ५० विघटीत क्षेत्र कमी केले आणि साईनऐजच्या क्षेत्रामध्ये वाढ झाली आहे आणि त्यामुळे कॉन्ट्रक्टरला जो जादाचा खर्च झाला होता. त्यावेळी जो काही डी.एस.आर.होता. त्या डी.एस.आर.प्रमाणे प्रत्यक्षात किती जाहिराती आहेत ते संपूर्ण मा.स्थायी समितीच्या डॉकेटमध्ये दिले आहे आणि या विषयाच्या संदर्भात बी.ओ.टी.कमिटीमध्ये संपूर्ण सविस्तर चर्चा झाली होती. त्यावेळी अशी चर्चा झाली होती की, मा.महा.आयुक्त यांना अधिकार असताना सुध्दा तुम्ही मा.स्थायी समितीच्या निदर्शनांस आणावे आणि मा.स्थायी समितीची मान्यता घ्यावी.

मा.अविनाश बागवे–तुमच्या म्हणण्यानुसार बी.ओ.टी.कमिटी मध्ये असे निर्देश दिले की, हे मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणा आणि मा.मुख्यसभेची मान्यता घेऊ नका, असे झाले का?

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–नाही, असे नाही. स्टॅंडिंगच्या निदर्शनांस ॲक्युचअली त्यावेळी मा.महा.आयुक्त यांना अधिकार होते. मा.बेंजामिन साहेबांनी सही केलेली कागदपत्रे, त्यांनी कॅल्क्युलेट केलेली कागदपत्रे सुध्दा माझ्याकडे आहेत.

मा.अविनाश बागवे–सर, आताही बी.ओ.टी.कोणताही प्रकल्प असेल तर त्यामध्ये मा.महा.आयुक्त यांनाच अधिकार असतात. परंतु पुढे ते मा.स्थायी समिती आणि मा.मुख्यसभेची मान्यता घेऊनच ते पुढे अंमलबजावणी करतात.

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–सुरूवातीला मा.मुख्यसभेची मान्यता घेतली होती आणि त्यामध्ये फेरबदल करण्याचे अधिकार मा.महा.आयुक्त यांना दिलेले आहेत. ते ॲग्रीमेंट मध्ये स्पष्ट आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–मग मा.स्थायी समिती समोर आणायची आवश्यकताच नव्हती.

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–बरोबर आहे पण त्यावेळी मा.महा.आयुक्त यांनी असे सांगितले होते की, कमीत कमी हे मा.स्थायी समितीच्या निदर्शनांस आणावे.

मा.अविनाश बागवे–मग एक्सटेंन्सचे ॲग्रीमेंट का केले नाही?

श्री.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–सर, एखादे टेंडर, समजा एखादे काम दोन वर्षामध्ये पूर्ण करायचे असेल आणि पहिले जे ॲग्रीमेंट केले होते त्यामध्ये त्याने १०० टक्के स्टॅम्प ड्युटी भरलेली आहे, ॲग्रीमेंट केलेले आहे. त्यानंतर जी मुदत वाढवून घेतली. आपण मुदत वाढविली. आपण जर एखाद्या ठेकेदाराला दोन वर्षाच्या कालावधी मध्ये काम पूर्ण करा असे म्हंटले आणि आपण मुदत वाढवून देतो. आपण प्रत्येकवेळेला ॲग्रीमेंट करीत नाही.

मा.अविनाश बागवे–सर, रूटीनचे टेंडर वेगळी गोष्ट आहे आणि ही वेगळी गोष्ट आहे. आपण असे काय करीत आहात? तुम्ही वारंवार स्टॅम्प ड्युटीचा विषय काढत आहात. हा विषय फक्त स्टॅम्प डयुटीशी रिलेटेड नाही. ॲग्रीमेंट मध्ये इतरही गोष्टी असतात की, त्यांनी पैसे भरले नाहीत तर आपण काय केले पाहिजे, आपण काय करू नये इ.

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)– सर ॲग्रीमेंट लागू आहे. ॲडीशनल जी मुदत आहे ती कंडीशन त्यामध्ये आणि ॲग्रीमेंट वाढीव केसेस करण्याचा क्लॉज आहे.

मा.अविनाश बागवे–तुम्ही एक्सटेंशन केल्याचे ॲग्रीमेंटच केले नाही म्हणून तुम्ही त्याच्यावर थकबाकीदार म्हणून त्यांच्यावर कारवाई करू शकत नाही.

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)– एक्सटेंशनचा जो काही हिशोब आहे. त्यावेळेला जो काही रेट आहे त्यांनी जो कालावधी कोट करून दिला आहे. आपण कालावधी मध्ये वाढ करून दिलेली नाही कालावधी फक्त स्प्रेड केला आहे.

मा.अविनाश बागवे–वाढ केली नाही, स्प्रेड केला.

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–आपण जाहिरातीचे क्षेत्र कमी केले आणि मुदत वाढविली आणि एकूण क्षेत्र व साईनचे क्षेत्र याचा विचार केला तरी ते तेच राहते.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, ही अनियमितता आहे. ही चुकीची गोष्ट आहे. आकाशचिन्ह विभागाने या आधी सुध्दा मा.स्थायी समितीला अहवाल दिला होता. त्यामध्ये राजदीप जे ठेकेदार, जाहिरातदार आहेत ते डिफॉल्टर आहेत. त्यांनी महानगरपालिकेला कोट्यावधी रूपये द्यायचे आहेत. आज आपण करार नसल्यामुळे आपण त्यांच्यावर मोठी कायदेशीर कारवाई करू शकत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

मा.सौ.मुक्ता टिळक–मला अशी माहिती पाहिजे की, दि.५/१० रोजी हे आकाशचिन्ह विभागाकडे जाणार हे तुम्हाला माहिती होते.

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–मॅडम मी, त्यापूर्वीच ३ ते ४ महिने आधीच मी स्वत:च तो टेंडर सेट दिलेला आहे. त्यांच्या खात्याला लेखी कळविलेले आहे. ज्यावेळी मा.महा.आयुक्त साहेब यांच्यासह बैठक झाली होती त्याच्या दुसऱ्या दिवशीच आकाश चिन्ह विभागाला लेखी कळविले आहे.

मा.अविनाश बागवे–मा.अति.आयुक्त साहेब, आज आम्ही जे मुद्दे सांगितले आहेत, त्याबद्दल तुम्ही आम्हाला माहिती सांगावी. आज आता मा.मुख्यसभा चालू होणार आहे.

मा.अध्यक्षा–मा.सभासदांनी जे मुद्दे उपस्थित केले आहेत ती माहिती समोर ठेवून, पुढील सभेमध्ये हे विषयपत्र सादर करावे. यामध्ये आवश्यक ती दुरूस्ती करून हा अहवाल पुन्हा सादर करावा.

मा.उपनगरसचिव–यामध्ये फेर अहवाल सादर करावा.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–मा.अध्यक्षा, यामध्ये आम्ही जो रिपोर्ट दिला आहे. त्या आधारावर मा.कमिशनर सरांनी संबंधीत खातेप्रमुखांना १५ दिवसांची नोटीसव्दारे असे विचारले आहे की, यामध्ये जी अनियमितता आली आहे त्याबाबत खुलासा द्यावा.

मा.अध्यक्षा–ती त्यांची जबाबदारी आहे.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–ती मुदत २२ तारखेपर्यंत आहे.

मा.अविनाश बागवे–त्यांचा खुलासा आल्यानंतर आपण हे सादर करावे.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–त्यानंतर मा.महा.आयुक्त साहेब निर्णय घेणार आहेत.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये मला असे वाटते की, यामध्ये प्रशासनाने चुकीची प्रक्रिया राबविलेली आहे म्हणजे प्रथम येईल त्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर जाहिरात नियमावलीच्या मार्गदशक तत्वांना अनुसरून मग ती तत्वे मा.स्थायी समितीला लागू आहेत, ही तत्वे होर्डिंग्जला लागू आहेत किंवा त्या ठेकेदाराला लागू आहेत, याबाबत माहिती द्यावी.

मा.अविनाश बागवे–या मार्गदर्शक तत्वाची सुध्दा माहिती द्यावी.

मा.बापूराव कर्णे गुरूजी–आपण यामध्ये तो उल्लेख देखील करावा.

मा.ओमप्रकाश बकोरिया,अति.महा.आयुक्त (इ)–संबंधीत खातेप्रमुखांना विचारले आहे की, हा जो रिपोर्ट आहे त्या अनुषंगाने तुमचा अभिप्राय, स्पष्टीकरण द्यावे.

मा.सौ.मुक्ता टिळक–यामध्ये नियम आणि अधिनियम काय आहेत? याबद्दल सुध्दा माहिती द्यावी.

मा.अविनाश बागवे–मा.खातेप्रमुखांचा खुलाशांसह फेरअहवाल आणि त्यामध्ये जे मुद्दे उपस्थित केले आहेत ते मा.स्थायी समितीकडे सादर करावेत.

**निर्णय–**सदर विषयाबाबत, मा.खातेप्रमुख यांच्या खुलाशांसह फेर अहवाल सादर करावा.

विषय क्र.१३८१

मा.अविनाश बागवे–काही महिन्यापूर्वी बी.आर.टी.संदर्भात कॅगचा अहवाल येऊन आपल्याकडे दीड कोटी रू.वसूली आली होती.याबाबत माहिती द्यावी.

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–यामध्ये दोन इश्यू आहेत एक ट्रान्सपोर्टेशनचे चार्ज जास्त दिल्यामुळे आणि दुसरा स्टाररेटचा इश्यू आहे. आपल्या टेंडर मध्ये जो ॲटम आहे तो इन्ड्युजल क्वॅन्टीटी.

मा.अविनाश बागवे–यामध्ये आपण वसूली केली आहे का?

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–आपण त्यामध्ये असे उत्तर दिले की, ट्रान्सपोर्टेशनचा रेट ४५०० क्युबिक मीटर आहे.

मा.अविनाश बागवे–मा.अध्यक्षा, आमची विनंती आहे की, संबंधीत प्रकल्पावर यामध्ये कॅगचा कोणता अहवाल सादर झाला? त्यामध्ये त्याचे आक्षेप कोणते होते? आणि आपण कोणती पूर्तता केली. याबाबत पुढील सभेमध्ये सविस्तर माहिती द्यावी. कारण आमची माहिती वेगळी आहे की, त्यांनी ताशेरे ओढले होते त्यांनी दीड कोटी रू.ची वसूली काढली होती. आपले प्रशासन इतके बोल्ड नाही त्यांनी असे त्याठिकाणी असे सांगितले की, आम्ही हे वसूल केले आहेत. आपले अधिकारी तिथे गेले परंतु मिटींग मधील अधिकाऱ्यांनी त्यांना परत पाठविले आणि आपल्यावर आणखी काहीतरी ताशेरे ओढले आहेत.

मा.बोनाला,अति.नगर अभि.(वाहतूक व प्रकल्प)–मा.अध्यक्षा, यामध्ये तसे झालेले नाही.

मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा परंतु याबाबत पुढील सभेत लेखी माहिती द्यावी.

**निर्णय–**सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

विषय क्र.१३८२
मा.अविनाश बागवे–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३८३
मा.अध्यक्षा–हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.
विषय क्र.१३८४
मा.अविनाश बागवे– हा विषय मान्य करावा.
**निर्णय**–सदरचा विषय सर्वानुमते मान्य करण्यात आला.

अशा पध्दतीने सभा समाप्त झाल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**

मा.राजेंद्र शिळीमकर–तुम्ही त्या विषयावर पाघरूंण घालत आहात का?
मा.अध्यक्षा–मी आपणास बोलण्याची संधी दिली म्हणून आपण वाट्टेल तसे आरोप करू नयेत, पांघरूण घालायचे काय कारण आहे?
मा.राजेंद्र शिळीमकर–संधी दिली म्हणजे,मला बोलायचा अधिकार नाही का?
(सभागृहात गोंधळ सुरू झाला)
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–हा मा.अध्यक्षा यांचा अधिकार आहे. कारण त्या ही सभा चालविणार आहेत. त्यांना जर वाटले की, तुमच्या प्रश्नाला उत्तर द्यायला पाहिजे तर द्यायला पाहिजे.
मा.राजेंद्र शिळीमकर–आम्ही अध्यक्षांना, नव्हेतर प्रशासनाकडे उत्तर मागत आहोत.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–ज्या पध्दतीने कामकाज ठरले आहे. ते त्या पध्दतीने कामकाज होणार. आता त्यांनी विषय सुरू करण्याबाबत आदेश दिले आहेत, तर विषय लगेच सुरू होतील.
मा.सौ.मुक्ता टिळक–मा.बकोरिया साहेबांना माहिती देऊ द्यावी.
मा.शंकर केमसे,सभागृहनेते–आम्हाला विषय लवकर उरकायचे आहेत. वेळेला काही महत्व आहे की नाही? आता विषय सुरू करावेत.
मा.सौ.मुक्ता टिळक– मग ही सभा सकाळी ११.३० वा.सुरू व्हायला पाहिजे होती.
मा.अध्यक्षा–